This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

M-2740

शिर्षक	ग्रंथकार	विषय	विस्तार (पुर्ण/ अपूर्ण)	टिकाकार	आकार	पृष्ठे	लिपी	सामग्री	Lines per page	Letters per line	Condition & age (शके/विक्रम सवंत)	Additional Particulars / Remark
विधवा विवाह संमान्या साद्यांत इतिहास.		दर्शन	पूर्ण		६/५	७५	मराठी	कागद	५	२५ [illegible]		

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्री [illegible]

विधवाविवाहखंडनाचा साद्यंत इतिहास.

श्री जगद्गुरु शंकराचार्यस्थापित करवीर संस्थानसिंहासनारूढ श्री विद्यानरसिंहभारती स्वामी यांची स्वारी शहर पुणें येथें येऊन सुधारलेले लोकांनीं म्हणजे इंग्रजी भाषा लिपीचा अभ्यास करून आपणास विद्वान् म्हणविणार यांणीं ब्राम्हण जातीचे विधवेचा पुनर्विवाह करणें शास्त्रसंमत आहे, यास्तव निर्बाध असून त्याची प्रवृत्ति मात्र नाहीं ती चालू करावी या विषयीं उद्योग चालवून एक पुनर्विवाह करविला. तेव्हां तो सशास्त्र किंवा अशास्त्र या विषयीं विष्णु परशुरामपंडित यांशीं, वेदशास्त्रसंपन्न नारायणाचार्य गजेंद्रगडकर यांस प्रमुख करून वाद करविला, त्यांत कलियुगामध्यें सदर पुनर्विवाह शास्त्रसंमत नाहीं असें ठरलें, त्याबद्दल श्री शंकराचार्य स्वामी याणीं स्वमुद्रांकित निर्णयपत्र करून शके १७९२ चैत्रवद्य २ मितीस जगद्धितेच्छु छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें; परंतु त्यांत पुनर्विवाहाचा वृत्तांत अति संक्षिप्त असल्यामुळें सर्वांस साद्यंत [illegible] माहिती होणार नाहीं या करितां सदर निर्णयपत्राचा व्याख्यानरूप हा साद्यंत इतिहास रचिला आहे. याचे भाग तीन केले आहेत.

इतिहास भाग १.

कितीएक इंग्रजी भाषा लिपीचा अभ्यास करणारे लोकांस, काय विद्वान् ते आपणच, असा अभिमान होऊन पारंपर्यानें चालत आलेल्या ज्या प्राचीन चाली, त्या दव भोळ्या मनुष्यांच्या वेड्या वेड्या चाली आहेत, त्या मोडून नवी सुधारणा करून आपला शहाणपणा मिरवावा, या हेतूनें प्रथम बिचाऱ्या गरीब ब्राम्हणास सरकारांतून पुणें येथें दक्षिणा मिळत होती त्यांत आपली विद्वत्ता चालवून बंद केली, असा परम कारुणिक तें पुढें बालविधवांचा मोठा कळवळा दाखवून पुनर्विवाह करावा, असा वि-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

षयीं लौकिक कल्पित कादंबरीच्या कांहीं युक्ति दाखवून लोकांस उपदेश करूं ला-
गले, नंतर शालिवाहन शके १७७० चे सुमारें बंगाल्यांत विद्यासागर ईश्वर चं-
द्र यांणीं कांहीं स्मृतिवचनांचे कल्पित अर्थ करून विधवास्त्रीचा पुनर्विवाह कर-
ण्याची ग्रंथरचना केली, आणि काशीक्षेत्रस्थ पंडित याजकडे संमतीस पाठवि-
ली, तिचें खंडन वेदशास्त्रसंपन्न काशिनाथ शास्त्री अष्टपुत्रे यांणीं करून पत्रद्वा-
रें ईश्वरचंद्र यांजकडे पाठविलें. परंतु त्यावर त्याणें प्रत्युत्तर न देतां आपले ग्रं-
थाचा इंग्रजी भाषेंत तर्जुमा करविला, त्याचें भाषांतर विष्णु परशुराम पंडित
सालारकर यांणीं महाराष्ट्र भाषेंत करून बुकें छापून वर्तमान पत्रांत हरहमे-
ष त्याच गोष्टी लिहित गेले व कित्येक इंग्रजी अभ्यास करणारे मास्तर व इं-
ग्रजी चाकर अनुकूल करून घेऊन शके १७७५ पासून या मध्यदेशांत पुन-
र्विवाहाची वाटाघाट चालवून शके १७८८ वैशाख मासीं नानाभिडे राहणार पु-
णें यांबरोबर एका विधवेचा विवाह लाविला. अशी वार्ता उठविली, ते वेळेस
त्यांजला प्रसिद्धपणानें कोणी बहिष्कार घातला नाहीं; कारण पुनर्विवाहोत्तेज-
क सुधारले लोक बोलत होते कीं, आम्हांस कोणी बहिष्कार मात्र म्हणावा म्हण-
जे तत्काल फिर्याद करून सरकारांतून त्यास शिक्षा देववूं, तेव्हां यांतील
मर्म इतर लोकांस माहित नसल्यामुळें भिऊन कोणी नाना भिडे यांस बहि-
ष्कार तर म्हटला नाहीं; परंतु त्यांशीं अन्नोदकादि व्यवहार मात्र अद्यापि को-
णी करीत नाहींत.

शके १७८७ सालीं सांप्रत जगद्गुरू आहेत यांचे गुरु श्रीविद्याशंकर
भारती स्वामी यांची स्वारी कोंकणांत गेली होती तेव्हां रत्नागिरी येथें पुनर्वि-
वाहोत्तेजक मंडळीनीं [illegible]ठा समाज भरवून श्रीजगद्गुरू स्वामींस पुनर्विवाह
विषयीं पृच्छा केली. त्या संभाषणांत रंग राहिला नाहीं. त्यानंतर श्रीची
स्वारी क्षेत्र कऱ्हाड येथें आली, आणि विठोबा अण्णा दप्तरदार, पंतप्र-
तिनिधी यांचे न्यायाधीश यांची शास्त्रांत मर्मज्ञता व बहुशोधकता पाहून
त्यांस श्रीची आज्ञा जाहली कीं, तुम्हीं पुनर्विवाहखंडनाचा उद्योग केला पाहिजे,
सांप्रत तुम्हीं न कराल तर वर्णसंकराचा प्रसंग तूर्तच येऊन पोंचला असें स-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मजावें. अण्णानीं ती आज्ञा शिरसा वंद्य करून त्या उद्योगास आरंभ के-
ला, तेसमयीं राजश्री सदाशिव रघुनाथ जोशी पानसकर कऱ्हाड मामले-
दार यांणी विधवाविवाहाचें बूक आणून अण्णास दिलें व राजश्री कृष्णराव
बाबजी भावे यांणीं, काशिस्थ काशिनाथशास्त्री यांणी ईश्वर चंद्राचे ग्रंथाचें
खंडन केलें त्या बद्दल त्यांचे शिष्य वेदशास्त्रसंपन्न राजाराम शास्त्री कारले-
कर यांणी संस्कृत भाषेंत केलेला निबंध वेदशास्त्र संपन्न कृष्णशास्त्री साठे
यांणी केलेल्या प्राकृत व्याख्यानासुद्धां आणून दिला, त्यावरून अण्णानीं त्या-
चा विचार करून पाहतां, काशिस्थ काशिनाथ शास्त्री यांणीं जें पुनर्विवाह
खंडन केलें तेणेंकरून न्याय, व्याकरण निष्णात जनांचा मात्र भ्रम दूर हो-
ईल; परंतु इतर जनांचा भ्रम विना प्रत्यक्ष निषेधक स्मृत्यादि वचनें दाख-
विल्या वांचून दूर होणार नाहीं असें अण्णास वाटलें, तेवेळेस राजश्री रा-
मचंद्र वेंकटेश शिराळकर राहणार उंबरज व रामचंद्र महादेव फणसाळक-
र राहणार इंदोली या उभयतांनीं, अण्णा, तुम्हांस जो प्रयत्न करणें असे-
ल तो करावा, खर्चाविषयींची कांहीं काळजी करूं नका, असा धीर दिल्याव-
रून अण्णानीं जेथें जेथें धर्मशास्त्रांच्या पुस्तकांचे संग्रह होते तेथें तेथें
जाऊन प्राचीन ग्रंथाचें अवलोकन करून कलियुगामध्यें विधवा स्त्री-
चा पुनर्विवाह करूं नये, अशा निषेधक वचनांचा बहुत संग्रह केला, आ-
णि त्या आधारानें, श्रीमंत श्रीनिवास परशुराम पंत प्रतिनिधि व चिमणा-
जी रघुनाथ पंत सचीव यांचे प्रेरणेवरून विवाहतत्व यानांवें एक ग्रंथाचा
मसुदा केला, आणि तो दुरस्त करून छापून प्रसिद्ध करावा या हेतूनें सातारक-
र वेदशा० नारायणाचार्य व त्र्यंबकशास्त्री माटे यांजपाशीं नेऊन त्यांजकडून
दुरस्ती करून घेतली. तो ग्रंथ विस्तार युक्त जाहल्यामुळें लोकांस लवकर बो-
ध होणार नाहीं याकरितां अण्णांचे कनिष्ट चिरंजीव रघुवीरराव यांणीं वि-
धवाविवाहसंहार या नांवांचा संक्षिप्त ग्रंथ केला, व थोडक्यांत सिद्धांत क-
ळावा यास्तव, अण्णांचे ज्येष्ट चिरंजीव सीतारामपंत यांणी विधवा-
विवाहसंहारसार या नावें ग्रंथ केला, तो रत्नागिरी येथील जगन्मित्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

युक्ति दाखवून लोकांस उपदेश करूं ला-
षयींलौकिक काल्पित कादंबरीच्या कांहीं युक्ति दाखवून लोकांस उपदेश करूं ला-
गले, नंतर शालिवाहन शके १७७० चे समारें बंगाल्यांत विद्यासागर ईश्वर चं-
द्र याणीं कांहीं स्मृतिवचनांचे कल्पित अर्थ करून विधवास्त्रीचा पुनर्विवाह कर-
ण्याची ग्रंथरचना केली, आणि काशीक्षेत्रस्थ पंडित याजकडे संमतीस पाठवि-
ली, तिचें खंडन वेदशास्त्रसंपन्न काशिनाथ शास्त्री अष्टपुत्रे याणीं करून पत्र द्या-
रें ईश्वरचंद्र यांजकडे पाठविलें. परंतु त्यावर त्याणें प्रत्युत्तर न देतां आपले ग्रं-
थाचा इंग्रजी भाषेंत तर्जुमा करविला, त्याचें भाषांतर विष्णु परशराम पंडित
सालारकर याणीं महाराष्ट्र भाषेंत करून बुकें छापून वर्तमान पत्रांत हरहमे-
षत्याच गोष्टी लिहित गेले व कितीएक इंग्रजी अभ्यास करणारे मास्तर व इं-
ग्रजी चाकर अनुकूल करून घेऊन शके १७७५ पासून या मध्यदेशांत पुन-
र्विवाहाची वाटाघाट चालवून शके १७८८ वैशाख मासीं नानाभिडे राहणार पु-
णें यां बरोबर एका विधवेचा विवाह लाविला. अशी वार्ता उठविली, ते वेळेस
त्यांजला प्रसिद्धपणानें कोणी बहिष्कार घातला नाहीं; कारण पुनर्विवाहोत्तेज-
क सुधारले लोक बोलत होते कीं, आम्हांस कोणी बहिष्कार मात्र म्हणावा म्हण-
जे तत्काल फिर्याद करून सरकारांतून त्यास शिक्षा देववूं, तेव्हां यांतील
मर्म इतर लोकांस माहित नसल्यामुळें भिऊन कोणी नानाभिडे यांस बहि-
ष्कार तर म्हटला नाहीं; परंतु त्यांशीं अन्नोदकादि व्यवहार मात्र अद्यापि को-
णी करीत नाहींत.

शके १७८७ सालीं सांप्रत जगद्गुरू आहेत यांचे गुरु श्रीविद्या शंकर
भारती स्वांमी यांची स्वारी कोंकणांत गेली होती तेव्हां रत्नागिरी येथें पुनर्वि-
वाहोत्तेजक मंडळीनीं [illegible]ठा समाज भरवून श्रीजगद्गुरू स्वामींस पुनर्विवाह
विषयीं पृच्छा केली. त्या संभाषणांत रंग राहिला नाहीं. त्यानंतर श्रीची
स्वारी क्षेत्र कऱ्हाड येथें आली, आणि विठोबा अण्णा दप्तरदार, पंतप्र-
तिनिधी यांचे न्यायाधीश यांची शास्त्रांत मर्मज्ञता व बहुशोधकता पाहून
त्यांस श्रीची आज्ञा जाहली कीं, तुम्हीं पुनर्विवाह खंडनाचा उद्योग केला पाहिजे,
सांप्रत तुम्हीं न कराल तर वर्णसंकराचा प्रसंग तूर्तच येऊन पोंचला असें स-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

भजावें. अण्णानीं ती आज्ञा शिरसा वंद्य करून त्या उद्योगास आरंभ के-
ला, तेसमयीं राजश्री सदाशिव रघुनाथ जोशी पोवसकर कऱ्हाड मामले-
दार यांणी विधवाविवाहाचें बूक आणून अण्णास दिलें व राजश्री कृष्णराव
बावजी भावे यांणीं, काशिस्थ काशिनाथशास्त्री यांणी ईश्वरचंद्राचे ग्रंथाचें
खंडन केलें त्या बद्दल त्यांचे शिष्य वेदशास्त्रसंपन्न राजाराम शास्त्री कारले-
कर यांणी संस्कृत भाषेंत केलेला निबंध वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री साठे
यांणी केलेल्या प्राकृत व्याख्यानासुद्धां आणून दिला, त्यावरून अण्णानीं त्या-
चा विचार करून पाहतां, काशिस्थ काशिनाथ शास्त्री यांणीं जे पुनर्विवाह
खंडन केलें तेणेंकरून न्याय, व्याकरण निष्णात जनाचा मात्र भ्रम दूर हो-
ईल; परंतु इतर जनाचा भ्रम विना प्रत्यक्ष निषेधक स्मृत्यादि वचनें दाख-
विल्या वांचून दूर होणार नाहीं असें अण्णास वाटलें, तेवेळेस राजश्री रा-
मचंद्र वेंकटेश शिराळकर राहणार उंबरज व रामचंद्र महादेव फणसाळक-
र राहणार इंदोली या उभयतांनीं, अण्णा, तुम्हांस जो प्रयत्न करणें असे-
ल तो करावा, खर्चाविषयींची कांहीं काळजी करूं नका, असा धीर दिल्याव-
रून अण्णानीं जेथें जेथें धर्मशास्त्रांच्या पुस्तकांचे संग्रह होते तेथें तेथें
जाऊन प्राचीन ग्रंथाचें अवलोकन करून कलियुगामध्यें विधवा स्त्री-
चा पुनर्विवाह करूं नये, अशा निषेधक वचनांचा बहुत संग्रह केला, आ-
णि त्या आधारानें, श्रीमंत श्रीनिवास परशुराम पंत प्रतिनिधि व चिमणा-
जी रघुनाथपंत सचीव यांचे प्रेरणेवरून विवाहतत्व यानांवें एक ग्रंथाचा
मसुदा केला, आणि तो दुरुस्त करून छापून प्रसिद्ध करावा या हेतूनें सातारक-
र वेदशा० नारायणाचार्य व त्र्यंबकशास्त्री माटे यांजपाशीं नेऊन त्यांजकडून
दुरुस्ती करून घेतली. तो ग्रंथ विस्तार युक्त जाहल्यामुळें लोकांस लवकर बो-
ध होणार नाहीं याकरितां अण्णांचे कनिष्ठ चिरंजीव रघुवीरराव यांणीं वि-
धवाविवाहसंहार या नांवांचा संक्षिप्त ग्रंथ केला, व थोडक्यांत सिद्धांत क-
ळावा यास्तव, अण्णांचे ज्येष्ठ चिरंजीव सीतारामपंत यांणी विधवा-
विवाहसंहारसार या नांवें ग्रंथ केला, तो रत्नागिरी येथील जगन्मित्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

क शक १२ दिवशीं निघण्याचा वेत ठरला पुढें अण्णा वाईक्षेत्रांतील विद्वज्ज-नांची संमति घेण्याकरितां निघाले तों वाटेस लिंबास गेले तेथें वेदशा॰ बाबा दिक्षीत अयाचित याणीं अण्णांस प्राचीन बहुत ग्रंथ दाखवून बरीच मदत दिली, नंतर अण्णा वांईस जाऊन सर्व विद्वज्जनांच्या भेटी घेऊन, नारायण भिकाजी जोगळेकर मामलेदार व रामराव रूबाजी मुनसफ व गणपतराव चुणेकर फौजदार यांचे साह्यानें सभा करून श्री विष्णूचे देवालयांत अण्णांनीं आपले ग्रंथाचीं तीन व्याख्यानें सांगितलीं; नंतर अण्णा भोरास जाऊन श्रीमंत पंतसचिव यांस वादासमयीं येण्याचें आमंत्रण केलें ते त्याणी स्वीकारून कांहीं खर्चाची तजवीज केली त्याच संधीस वेणूचा घटस्फोट, शके १७९१ भाद्रपद वद्य ९ रोजीं तिचे सासरच्या लोकांनीं प्रांतांतील ब्राम्हणांचे संमतीनें केला; इतक्यांत गोपाळराव हरी देशमुख यांणीं बडोद्याचे अधिपति श्रीमंत खंडेराव महाराज यांस अनुकूल करून घ्यावें या हेतूनें तेथें जाऊन पुनर्विवाह सशास्त्र असून रूढींत नाहीं त्यामुळें गर्भपातादिक अनेक अनर्थ होतात, त्यापेक्षां विधवांचा पुनर्विवाह करावा हें योग्य आहे. आतां पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे याविषयीं आम्हीं शास्त्री लोक आणवितों ते आपली खात्री करतील. असें बोलून विष्णु पंडित व कृष्णशास्त्री चिपळुणकर वगैरे मंडळीस बडोदें येथें नेलें नंतर महाराजांची भेट झाली, महाराज याणीं आपले पदरचे शास्त्री मंडळीस विचारितां त्यांणीं सांगितलें कीं, पुनर्विवाह सर्वथा अशास्त्र आहे, जर आलेली मंडळी प्रतिज्ञा करतील तर आम्हीं वादास सिद्ध आहों. नंतर महाराज यांणीं त्या लोकांस सांगितलें कीं, तुम्हीं, आमचे पदरचे शास्त्री यांशीं वाद करावा; जे खोटे ठरतील त्यांस आम्हीं शिक्षा देऊं, ती कबूल असल्यास वाद करावा, हे ऐकतांच पंडित वगैरे हें नाकबूल करून मुंबईस परत आले, आणि पुनः नाताळ्याचे रूढींत परत जावयाचें आहे, अशी वर्तमानपत्रद्वारें वार्ता उठविली, या समयीं श्रीमंत खंडेराव महाराज यांणीं धर्माचा अभिमान धरून सदर काम केलें हें मोठें लौकिकाचें व श्रेयस्कर केलें. परमेश्वर अशा पुरुषाची उ-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नरोतर वढती करो. या समयीं राजमा० ताला छत्रे यांणीं बहुत उपयोग केला असावा. यानंतर विठोबा अण्णा दप्तरदार, कऱ्हाड क्षेत्रांतील राघवाचार्य मुद्गर, व सिद्धेश्वर दीक्षित गरुड, माधवाचार्य घळसासी, काशिनाथ दीक्षित गिजरे व भाऊदीक्षित गिजरे, भाउ दीक्षित ढवळीकर व श्रीधर पाठक प्रभृति सुमारें २५ विद्वान समवेत वादाचे उद्देशानें कार्तिक वद्य ५स निघाले ते वेळेस सदाशिवराव अबा कऱ्हाड मामलेदार याणी खर्चाचीबरीच तजवीज केली अण्णा निघोन पुण्यास कार्तिक वद्य १२ दिवशीं येऊन पोहोंचल्या नंतर लक्ष्मण बल्लाळ कसोमण याणी अण्णास सदर कामी खर्चास ८० रुपये दिले अण्णानीं बाळशास्त्री टोंकेकर व रामदीक्षित आपटे व गोविंदशास्त्री साठे व नारायणशास्त्री थत्ते व गंगाधरशास्त्री दातार व जनार्दनाचार्य वके प्रभृति शास्त्री मंडळीच्या भेटी घेऊन करवे यांचे घरीं समाज करून केलेला ग्रंथ दाखवून त्यांज कडून दुरस्त करून घेतला, विष्णु पंडित मुंबईहून पुण्यास येईनांत, परंतु त्यांचेच मंडळीनीं पत्रावर पत्रें पाठवून त्यांस आणविलें त्याणीं अण्णांची भेट घेतली, वादाची गोष्ट निघाली ते वेळेस अण्णा बोलले कीं, श्रीजगद्गुरूंचें आम्हांस आज्ञापत्र आलें आहे कीं, स्वारी आल्या वांचून वाद करूं नये. स्वारीही लौकरच येईल. आम्हीं विनंती पत्र पाठवितों. आठ चार दिवसांतच स्वारी येईल नंतर वाद सुरू करूं असे सांगून, सदर शास्त्री मंडळीचे व आपासाहेब नातु, आबासाहेब शास्त्री पटवर्धन, बापुसाहेब परांजपे, रंगराव पुरंदरे, रावसाहेब रास्ते व सखाराम दादा पटवर्धन प्रभृति गृहस्थ मंडळीचे संमतानें शेषाप्पा नाईक पाच्छापुरकर यांचे माडीवर अण्णांनी पांच व्याख्यानें सांगितलीं त्यावरून अबाल वृद्धांस कळून सर्व लोकांचे मनांतील भ्रांति निघून जिकडे तिकडे पुनर्विवाह अशास्त्र असें लोक बोलूं लागले हें पाहून विष्णु पंडित याणींही विश्रामबागचे वाड्यांत आपलें व्याख्यान दोन दिवस दिलें. पुढें सोन्याबापू मांडे यांचे घरीं व्याख्यान सुरू केलें आणि अण्णास वादाविषयीं पत्रें २ लिहिलीं

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां अण्णांनीं सर्व शास्त्री व गृहस्थ मंडळीचे अनुमतानें वादाचे निर्बंधाची याद केली त्यांत मुख्य मुद्दे असें कीं, सर्व सभासदानीं पंच व सरपंच नेमावे, ते लोक सांगितील तो वादाचा निर्णय समजावा. वादांत विष्णुपंडित पराजित जाहल्यास त्याणीं तो पक्ष सोडून देऊन प्रायश्चित्त घ्यावें, अण्णा पराजित झाल्यास त्यांचे पक्षावर त्याणीं सही करावी, ती याद आबासाहेब शास्त्री पटवर्धन यांचे मार्फत पंडित यांजकडे पाठविली, त्यांचे उत्तर त्यांजकडून आलें त्यांत सदर दोनीं कलमें आम्हांस मान्य नाहींत, उभयतांनीं आप आपले पंच आणावे, व वाद श्रवण करणार मंडळी हे उभयतां कडील सम समान असावेत विषम असूं नयेत, वाद लेखी करावा, तो छापून प्रसिद्ध केल्या नंतर सर्व लोक निर्णय समजतीलच, असें लिहिलें तें पाहून या वादांत तात्पर्य नाहीं असें जाणून ज्या वादांत तूर्त निर्णय होणें नाहीं तो वाद करून तरी उपयोग काय? असें अण्णांनीं उत्तर दिल्या नंतर सोन्याबापु मांडे बोलले, प्रायश्चित्ताची मात्र प्रतिज्ञा नको, सरपंच पाहिजे हें ठरविलों तें अण्णानीं मान्य केलें; परंतु विष्णुपंडित यांस मान्य न जहाल्यामुळें वाद तहकूब झाला. पुढें पंडित याणीं मांडे यांचें घरीं व्याख्यान चालू केलें होतें तें समाप्त केलें; नंतर त्यांचे मंडळीनीं त्यांचा सत्कार करणेचा बेत केला ते समयीं मांडे बोलले सत्कार करणे सारखें कृत्य जाहलें नाहीं यास्तव अमचे घरीं नको तुम्हास कर्तव्य असल्यास अन्यत्र करा त्यावरून ठाणे आळींत गोविंद अपा वाळेकरांचे माडीवर सत्कार होऊन पंडित मुंबईस गेले पुढें अकरा असामी जे बहिष्कृत केले त्यापैकी विष्णुपंत भिडे याची मातुश्री वारली तीची सपिंडी नासिककर कोणी करीनात तेव्हा

विष्णुपंडित नाशिकास जाऊन ते कृत्य करून तेथें आपलें व्याख्यान दिलें तेव्हां नाशिकर याणीं ज्या घरीं व्याख्यान झालें त्यास व श्रवणास जाणारे लोकांस बहिष्कार टाकला, आणि विष्णुपंडित यांस नोटीस दिलीकीं; प्रतिज्ञा करून वादास यावें आम्हीं सिद्ध आहों पुनर्विवाह प्रकरणी प्रतिज्ञा करून वाद कर्तव्य नसेल तर व्याकरण अगर न्याय किंवा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मीमांसा अथवा धर्मशास्त्र यांत वाद करावा, याचें उत्तर पंडित याणीं दिलें कीं, न्याय, मीमांसा, व धर्मशास्त्र यांत आमचा अभ्यास नाहीं, व्याकरणांत अभ्यास केला; परंतु तो करून तीस वर्षें झालीं. पुनर्विवाह प्रकरणीं वाद करूं परंतु प्रतिज्ञा करणार नाहीं, असें कोणतेही वादास कबूल न होऊन यरंत मुंबईस गेले. श्री जगद्गुरु शंकराचार्य स्वामी यांची स्वारी पुण्याचे आसपास गांवी येऊन, किती एक सरदारांकडे वकील व आज्ञा पत्रें रवाना केलीं, तशींच क्षेत्रो क्षेत्रींचे पंडित मंडळीस आमंत्रण पत्रें पाठविलीं त्यांत श्रीमंत जयाजीराव महाराज शिंदे अलिजाबाहादूर याणीं जगद्गुरूचें आज्ञा पत्र शिरसा मान्य करून आपले पदरचे सर्व लोकांची कचेरी करून पुनर्विवाह अशास्त्र आहे यास कोणी अनकूळ होऊं नये असे संमती पत्र करून आपले राज्यांत जाहिरनामे केले कीं, जो पुनर्विवाहास अनुकूल होईल त्यास शिक्षा मिळून हद्दपार केला जाईल, असा बंदोबस्त करून वेदशास्त्र० रामाचार्य गजेंद्र गडकर व गोपाळाचार्य कऱ्हाडकर हे आपले आश्रित पंडित यांस वादा करितां श्री जगद्गुरूकडे रवाना केले, या महाराजांची गुरुभक्ती व धर्मनिष्ठा किती म्हणोन सांगावी? या काळीं अशा गोष्टी होणार नाहींत, परंतु यांचे वडिलार्जित पुण्य सबळ व यांजवर श्री हरीचा पूर्ण प्रसाद असें समजलें पाहिजे, श्री जगद्गुरूचे आमंत्रण पत्रावरून श्री काशी क्षेत्रस्थ प्रभृति पंडित मंडळी तत्काळ पुण्यास येणेस निघाली. पुणेकर मंडळींनीं अंणांचा सत्कार खाजगीवाले यांचे दिवाणखान्यांत समाज करून उत्तम प्रकारें केल्या नंतर अण्णा मुंबईस गेले तेथें राजश्री नीळकंठराव बाबा जोशी याणीं गिरगांवांत आंगरे यांचे वाड्यांत समाज करून अण्णां कडून पांच व्याख्यानें करवीलीं. श्रवणास केलेली जागा पुरेनाशी जाहली असे लोक येत होते, ज्याणीं ज्याणीं तीं व्याख्यानें ऐकिलीं, ते ते लोक सर्वथा निःशंक जाहले. शेवटचे दिवशीं अण्णांचा सत्कार जोशी याणीं चांगला केला. ज्यास जोशी यांजकडून आमंत्रणें नसल्या कारणामुळें श्रवण जाहलें नाहीं त्या सर्व लोकांचे समा-

धानार्थ अण्णानीं पुनः ठाकुरद्वारीं हिंदुधर्मे व्यवस्थापक सभास्थानीं पांच व्याख्यानें सांगितलीं. तेणें करून सर्व लोकांची खात्री जाहलीकीं, पुनर्विवाह शास्त्र संमत नाहीं. असे होतांच विष्णु पंडितानींही आपले व्याख्यानाचा आरंभ केला आणि निळकंठरावजी यांस त्या मंडळी कडून चिट्या येऊं लागल्या कीं, एकतर्फी व्याख्यानें दिल्यांत तात्पर्य काय आहे, समक्ष वाद झाला पाहिजे, त्यावर त्यांणीं उत्तर दिलें कीं, अण्णा वादास सिद्ध असतां पुणें येथें प्रतिज्ञा व सरपंचास जे नाकबूल जाहलां ते येथें कबूल व्हावें. म्हणजे समक्ष वाद होईल. असें एक दोनवेळ उत्तर दिले. तत्रापि चिट्यांवर चिट्या येऊं लागल्या, नंतर नीळकंठरावजी याणीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेब बिवलकर यांजकडून विष्णु पंडितांस लिहविलें कीं, आज अण्णांचा व आपला वाद व्हावा. अट कोणतीच नाहीं. निर्णय करणार बहुत लोकांस आमंत्रण केलें आहे, त्याचें उत्तर त्यांजकडून आलें. त्यांत निर्णयाचा वाद होणें असेल तर आमचे पंच नूतन नाहींत ते येण्यास आठ पंधरा दिवसांची मुदत पाहिजे, आणि आमचे वादाचे निर्बंध पूर्वी अण्णांस व हाडीं आपल्या कडेही पाठविले आहेत, ते अण्णानीं कबूल केले पाहिजेत, आजतर आम्हाला येण्यास फुरसत नाहीं. असें लिहिल्यावरून ते दिवसीं केवळ अण्णांचेंच व्याख्यान जहालें, भाऊसाहेब याणी अण्णास सत्काराबद्दल ६५ रुपये दिले पुढें गुंडाचार्य कन्हाडकर याणीं एक नोटीस दिलीकीं, चार दिवसांत कोठें पाहिजे तेथें आम्हीं वाद करितों, उत्तर पाठवावे, परंतु त्यांचें उत्तर आलें नाहीं. व रामाचार्य व अनंताचार्य गजेंद्र गडकर याणींही समक्ष वाद करण्या साठीं बहुत खटपट केली, परंतु योग जमूं दिला नाहीं. मुंबईकर याणीं अण्णाचा सत्कार फार चांगला केला तों इतक्यांत श्रीजगद्गुरूंची स्वारी पुण्यास येऊन दाखल झाली. श्रीमंत पंत प्रतिनिधि व पंत सचिव व सर्व पटवर्धन व रास्ते व जव्हारकर राजे साहेब इत्यादि सरदार व आपासाहेब नातु वगैरे पुणें येथील संभावित गृहस्थ व शास्त्री, वैदिक व इतर लोक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सामोरे जाऊन श्रीस मोठ्या समारंभाने गांवांत फाल्गुन शुद्ध ४ दिवशीं आणून शनवार पेठेंत दीक्षित यांचे घरीं पोंचविले. तो जो समारंभ झाला असा समारंभ पूर्वी कधींच जाहला नाहीं, असें वृद्ध वृद्ध लोक म्हणतात असो, श्रींचे आज्ञा पत्रावरून मिळाली ती पंडित मंडळी.

२ काशीकर ....

१ शालिग्रामशास्त्री १ धुंडिराज शास्त्री धर्माधिकारी

१ कऱ्हाडकर विठोबा अण्णा दप्तरदार ....

२ नाशिककर ....

१ सदाशिवशास्त्री १ दिनकर शास्त्री पुरोहित.

२ वांईकर ....

१ भिकुशास्त्री ऐनापुरे १ बाळकृष्णाचार्य रड्डी

४ सातारकर. ....

१ नारायणाचार्य गजेंद्रगडकर १ अनंताचार्य गजेंद्र गडकर.

१ त्र्यंबकशास्त्री माटे १ वेंकटेशास्त्री माटे

३ नगरकर. ....

१ नाना जोशी रेरंदे १ हरिशास्त्री १ नाना अग्निहोत्री

१ नागपुरकर गजाननशास्त्री ....

३ टुंदुरकर ....

१ गणेशशास्त्री कोल्हटकर १ गोविंदशास्त्री १ दिनकरशास्त्री

३ ग्वालेर ....

१ गोपाळाचार्य कऱ्हाडकर १ वासुदेवशास्त्री कऱ्हाडकर

१ रामाचार्य गजेंद्र गडकर. ....

४ मुंबई ....

१ आपाशास्त्री खाडिलकर १ कृष्णशास्त्री भाभट

१ पांडुरंगशास्त्री भावे १ गणेशशास्त्री मालवणकर

१० पुणें येथील. ....

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

१ बाळशास्त्री देव १ अण्णा[illegible]स्त्री थत्ते १ रामदिक्षित आपटे
१ गोविंदशास्त्री साठे १ गंगा[illegible]र शा॰ दातार १ जनार्दनाचार्य बळे
१ कृष्णशास्त्री राजवाडे १ भावाचार्य अष्टपुत्रे १ सदाशिवशास्त्री थत्ते
१ गंगाधरशास्त्री शहाणे

१ नारायणशास्त्री माहुलीकर

४ श्री जगद्गुरूंचे आश्रित . . . .
१ राघवाचार्य कालगांवकर १ श्रीपादशास्त्री
१ हरिशास्त्री मुंबईंतील मठाधिकारी १ नागेश शास्त्री

२ सांगलीकर . . . .
१ भिकुशास्त्री गडबोले १ रावजी शास्त्री आगाशे

येणे प्रमाणें शास्त्री लोक मिळाले. पैकीं बाहेरून आलेले लोकांचें भोजनांची वगैरे व्यवस्था श्री जगद्गुरूंचे संस्थानांतून उत्तम प्रकारें ठेविली होती, नंतर विष्णुपंडित यांस आज्ञापत्र जाऊन ते आले, त्यांणीं श्री जगद्गुरूंचें दर्शन घेतलें, वादाचे मजकुराचा उपक्रम निघतां, जे विठोबा अंणा दप्तरदार यांचे समोर वादाचे आपले नियम दाखविले तेच पुढें काढिले, परंतु श्रीमंत पंत सचिव व गोपाळराव हरी देशमुख याणीं सरपंच नसेल तर वादाचा निर्णय कोणते मार्गानें होणार त्यापेक्षां सरपंच अवश्य पाहिजे अशी विष्णुपंडित यांची खात्री करून वेदशास्त्र॰ गोपाळाचार्य कऱ्हाडकर सरपंच ठरविले आणि उभय पक्षांचे पंच नेमून निषेध पक्षाकडून नारायणाचार्य गजेंद्रगडकर याणीं वाद करावा. पुनर्विवाह मंडळीकडून विष्णुपंडित याणीं वाद करावा. पंचाधिक्य होईल तो निर्णय, समान पंच जाहल्यास सरपंच सांगतील तो निर्णय समजावा. असा ठराव होऊन यादीवर पंतसचिव व आपासाहेब नातु यांचे विद्यमाने उभयतांच्या सह्या होऊन फाल्गुन वद्य ११ दिवशीं श्री जगद्गुरू समक्ष सदर शास्त्री व सरदार लोक व संभावित गृहस्थ सन्निध

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

असून वाद सुरू जाहला. जो वाद होई तो तत्काल लिहिला जात असे. आणि बाळशास्त्री देव टोंकेकर, रामदिक्षित आपटे, गंगाधर शास्त्री दातार, गोविंदशास्त्री साठे व त्र्यंबक नाना मारे प्रभृति मंडळी नारायणाचार्य यांस सूचऊन देण्यास तत्पर होते, व विठोबा अण्णा दप्तरदार श्रुति, स्मृति व पुराणांतील वचनांचा पुरावा देण्यास अध्यक्ष होते, विष्णु शास्त्री यांस महादेव गोविंद रानडे, जनार्दन सखाराम गाडगीळ व रामकृष्ण गोपाळ शेणवी वगैरे मंडळी सूचक असोन वर्षप्रतिपदेचा दिवस वर्ज करून चैत्रशुद्ध तृतीया पर्यंत आठ प्रसंग वादाचे होऊन वाद समाप्त झाला. नंतर श्री जगद्गुरूंची आज्ञा पंचास जाहली कीं, जाहलेले वादांतील कागदावरून विचार करून आपआपले अभिप्राय सरपंचाकडे तीन दिवसांत द्यावे. त्यावरून पंच दाजीसाहेब किबे यांचे वाड्यांत बसून विचार करून पंचांनीं अभिप्राय दिलेसे.

पुनर्विवाह निषेध पक्षाकडील.

५ निषेध पक्षाकडे नेमलेले पंच असामी ....

१ भिकाचार्य ऐनापुरे वांईकर. १ गणेशशास्त्री इंदुरकर.

१ दिनकरशास्त्री खांबेटे नाशिककर. १ भिकुशास्त्री गडबोले पुणेंकर

१ आपाशास्त्री खांडिलकर.

या पांच असामींचे लिहिण्यांत कलियुगांत ब्राह्मण विधवा स्त्रीचा पुनर्विवाह करणें शास्त्रसंमत नाहीं. (नष्टे मृते) हें वचन, कृते सप्तपदे इत्यादिक निषेध वचनांचे विरोधास्तव पालकपर अगर सप्तपदीचे पूर्वी लावणें धर्मशास्त्र रीतीस युक्त आहे, नाहीं पेक्षां अनेक वचनांचा बाध करावा लागतो.

१ पुनर्विवाहोत्तेजक मंडळींचे पक्षापैकीं वेंकटशास्त्री मारे यांचे लिहिण्यांत सदर प्रमाणेंच आहे.

येणें प्रमाणें निषेध पक्षाकडे पंचाधिक्य जाहलें. ६

उत्तेजक पक्षाकडील पंचाचें अभिप्राय अर्धवट.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

१. कृष्णशास्त्री चिपळोणकर यांचें लिहिण्यांत पुनर्विवाह करणें अगर न करणें यांस कांहीं साधक व कांहीं बाधकही आहेत त्यांची व्यवस्था लावितां पुनर्विवाह विधीस जरी सशास्त्रता दिसते तथापि तो गौण, एकदेशी व आपद्धर्म असें स्पष्टपणें कबूल केलें पाहिजे, व तो शेंकडों वर्षे रूढींत नाहीं तो प्रचारांत आणावा हें काम मोठ्या भयंकर जोखमीचे आहे, सबब या सर्वांचा विचार करणें श्री जगद्गुरूंकडे आहे.

२ रावजीशास्त्री आगाशे यांचे लिहिण्यांत एक (नष्टे मृते) हें वचन मात्र पुनर्विवाहास साधक दिसतें, परंतु तें प्राचीन व अर्वाचीन बहुत ग्रंथांस विरुद्ध, रूढीं तर मुळींच नाहीं यांचा विचार श्रीजगद्गुरूंनीं करावा.

३. केशवशास्त्री गाडगीळ वांईकर यांचे लिहिण्यांत पुनर्विवाहास शास्त्राधार नाहीं असें म्हणवत नाहीं, तथापि हा विवाह गौण आपद्धर्म असून रूढींत नाहीं हें खरें आहे.

४ रघुनाथशास्त्री शेंडे पुणेकर यांचे लिहिण्यांत (नष्टे मृते) हें वचन पुनर्विवाहास साधक नाहीं असें म्हणवत नाहीं, तथापि हा शास्त्रार्थ गौण व एकदेशी मोठ्या भीतीचा आहे त्या विषयीं श्रीनीं आज्ञा करणें ती करावी.

• वेंकटशास्त्री माटे यांचें मत निषेधपक्षाकडे पडलें सबब.

या प्रमाणें चार असामींचे अभिप्राय पडले यांत तरी सर्वांचे लिहिण्यांत पुनर्विवाहास प्रशस्तत्व असून रूढींत आणावा असें साफ नाहीं.

येणें प्रमाणें पंचांचे अभिप्राय पडले. यांत पंचाधिक्य जाहलें येणें करून ठरावांत लिहिल्या प्रमाणें पुनर्विवाह अशास्त्र असा निर्णय तर होऊन गेला. उत्तेजक पक्षाचे पंचांचे अभिप्राय बळकटीचे नाहींत तथापि श्री जगद्गुरूंचे आज्ञे वरून सरपंच गोपाळाचार्य कऱ्हाडकर यांणीं आपला अभिप्राय दिला कीं, पुनर्विवाह अशास्त्र खचित आहे, त्या वरून फारच बळकटी जाहली. नंतर जाहलेले वादांत कांहीं विषया

विषयीं स्पष्टता जाहली नव्हती ती होणे बद्दल बहुत लोकांनीं श्रीजग-द्गुरूपाशीं विनंति केल्यावरून विठोबा अण्णा दप्तरदार यांजकडून चैत्र शुद्ध ८ पासून दशमी पर्यंत व्याख्यानें करविलीं. विष्णुपंडित यांस श्रवणार्थ बोलाविलें; परंतु आले नाहींत. अण्णानीं संक्षेपांत सर्व विषय प्रतिपादन करून लोकांची खात्री केली, नंतर केरोपंत छत्रे वगैरे १७१ मंडळी पुनर्विवाहाची अशास्त्रता ठरल्यावांचून अकरा असामीं वर बहिष्कार घातलेला आम्हांस मान्य नाहीं. असें म्हणणारी श्रीजगद्गुरूपाशीं येऊन आतां आमची खात्री जाहली. केलेल्या कर्माची क्षमा असावी, म्हणून राजश्री विष्णुपंत भाऊ यांचे विद्यमानें शरण येऊन मोकळे जाहले. शेवटास श्रीजगद्गुरूंनीं केलेला निर्णय सभेमध्यें वाचून प्रसिद्ध केला कीं, सांप्रत कलियुगामध्यें ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तीन जातींचा एकवेळ विवाह जाहलेल्या स्त्रियांचा पुनर्विवाह करणें अशास्त्र असें ठरलें. काशिकर धुंडिराजशास्त्री व शाळग्राम शास्त्री यांणीं विष्णुपंडित यांस नोटीस दिलीकीं, तुम्हीं राजारामशास्त्री यांचे निबंधावर खंडन लिहिलें आहे, त्याविषयीं दोन घटिका तरी वाद ल्हावा; परंतु त्याचें उत्तर पंडित याणीं दिलें. कीं, एथें आम्हांस वादास येण्याची सोय नाहीं, तुम्हीं मुंबईस यावें म्हणजे तेथें आमचे घरीं वाद करूं. श्रीजगद्गुरूंनीं केलेला निर्णय पुनः सर्वांस जाहीर व्हावा म्हणून चैत्र वद्य २ दिवशीं मोठा समाज करून सर्वांस वाचून प्रसिद्ध केला. त्याच्या प्रति छापवून जागोंजागीं रवाना जाहल्या आहेत. धन्य धन्य श्रीजगद्गुरु शंकराचार्य स्वामी महाराज परम पुण्यशीळ केवळ धर्ममूर्ति यांची स्वारी आल्यामुळें ज्या गोष्टी घडावयाच्या नाहींत त्या घडून येऊन नास्तिक लोकांचा पराभव होऊन धर्मस्थापना झाली. ज्या महाराजांचे पुण्य प्रभेचा प्रताप काय सांगावा ? कीं, मिळालेल्या पंडित मंडळीचा सत्कार श्रीमंत लोकांनीं तर मोठाच केला, परंतु गरीब गुरीबही लोकांकडून गंधाक्षत, हार, तुरे, गजरे, अत्तर, गुलाब

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व तांबूल दक्षिणादिक सत्कार होत होते त्यास वेळच सांपडेना अशी गर्दी जाहली. शेवटीं श्रीजगद्गुरूनीं सर्वांस भोजन प्रसाद व योग्यतेनुसार शाल जोड्या व धोत्रजोडे वगैरे वस्त्रें देऊन येतां जाताचे खर्चाचीव्यवस्था करून सर्वांचें समाधान राखून रवानगी केली; तेणें करून सर्वांस आनंद जाहला.

इतिहाससमाप्त.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वी असे याज्ञवल्क्य सांगतात.

अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरः पुत्रकाम्यया॥ सपिंडो वास गोत्रो वा घृताभ्यक्त ऋतावियात्॥ आगर्भधारणाद्गच्छेत् पतितस्त्वन्यथा भवेत्॥१॥

अर्थ- स्त्रियांस संतान नसून वंशक्षय प्रसक्त झाला तर, गुर्वादिकांचे आज्ञेनें दीर अगर सपिंड किंवा गोत्रांतील कोणी एक योग्य पुरुष यांणीं तिजला पुत्र करून द्यावा. संग करणे तो ऋतुकालींच घृताभ्यक्त म्हणजे मळकट पणानें करावा विलास करूं नये, गर्भ धारण जाहल्या नंतर संग करील तर पतित होईल.

सपिंड व सगोत्र नसेल तर अन्य योग्य पुरुषापासून जा उत्पन्न करून घ्यावी असे वसिष्ठ सांगतात.

नोन्मत्तां कामवशां व्याधितां वा नियुंज्यात्॥ ननु खलु कुलीन विद्यमाने परगामिनी स्यात्॥

अर्थ- वेड लागलेली व व्यभिचारिणी व प्रजोत्पत्ति प्रतिबंधक रोग युक्त अशा स्त्रीस आज्ञा देऊं नये. व स्वकुलांत नियोग योग्य पुरुष असल्यास परका प. हूं नये.

प्रजार्थ पर पुरुषाशीं संग केल्यास त्यास दोष नाहीं असे नारद सांगतात ती स्मृती कल्पतरू ग्रथांत आहे.

प्रजाप्रवृत्तौ नारीणां वृत्तिरेषा प्रजापतेः॥ अतोन्य

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गमनेस्त्रीणामेवदोषोनविद्यते ॥१॥

अर्थ— प्रजोत्पत्ति पुरता परपुरुषाशीं गुर्वादिकांचे संमतानें संग केल्यास दोष नाहीं. असा स्त्रियांस ब्रम्हदेवाचा वर आहे.

यातील सारांश

पति परागंदा झाला, किंवा मरण पावला, किंवा संन्यासी जाहला, किंवा नपुंसक निघाला, किंवा बाटला, किंवा जन्मठेपेस गेला, किंवा व्याधिग्रस्त जाहला इत्यादि प्रजा उत्पन्न न होण्याचीं कारणें प्राप्त झाल्यास प्रजोत्पत्ति प्रति बंधक रोगरहित व अव्यभिचारिणी, अशा स्त्रीस पतीनें तदभावीं मातापितरानीं तदभावीं सासूसासऱ्यानीं तदभावीं ज्ञातिबांधवानीं पुत्रा पुरता. दिराशीं अगर सपिंडाशीं अगर सगोत्राशीं तदभावीं परकी याशीं संग करण्याची आज्ञा द्यावी. हे कोणी नसल्यास आपण जातीनेंच नियोग करावा. तीन पुत्रां हून अधिक करूं नये. मध्यें कन्या झाल्यास, तिची तिहिंत गणना नाहीं. या व्यभिचारास दोष नाहीं. या संततीस क्षेत्रज म्हणतात. गर्भ धारण झाल्या नंतर व तीन पुत्र झाल्या नंतर संग घडेल तर दोघेही पतित होतील.

हा नियोग केलाच पाहिजे असें नाहीं. तर, पाहिजे असल्यास करावा. असा ऐच्छिक आहे.

यास प्रमाण. मनुः

मृते भर्तरियानारीब्रम्हचर्येव्यवस्थिता ॥ स्वर्गंगच्छत्यपुत्रापियथातेब्रम्हचारिणः ॥१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ- भर्ता मृत झाल्या नंतर जी स्त्री ब्रम्हचर्यानें राहती ति जरी पुत्र नसला तरी उत्तम लोकास जाते. जसे नैष्टिक ब्रम्हचारी पुत्र नसून ब्रम्हचर्याचे योगानें उत्तम गतीस जातात. तसी तीही जाते.

सदर नष्टे मृते हे नारद वचन पुनर्विवाह पर असे विष्णु पंडित याचे म्हणे परंतु ते समंजस नव्हे कारण नारदास जो काय पुनर्विवाहाचा विषय सांगावयाचा होता तो यानियोग प्रकरणाचे पूर्वि सांगितला आहे असाकी॥ उन्मत्तः पतितः क्लीबो दुर्भगस्त्यक्त बांधवः दीर्घकुत्सित रोगाढ्यो व्यंगो दोषगणो वरे ऊढ्हा हिताऽपिया कन्या नचेत्सं प्राप्त मैथुना॥ पुनः संस्कार मर्ह्येति यथा कन्या तथैवसा॥ ॥अर्थ॥ वेडा किंवा बाटला किं॰ नपुंसक किं॰ कुरूप किं॰ त्यक्त बांधव म्हणजे स्वजन टाकून गेला म्ह॰ (मेला किंवा गेला कि॰ सन्यासी झाला असा त्रिविध त्यक्त बांधव) किंवा व्याधिग्रस्त किं॰ व्यंग म्ह॰ आधळा वगैरे अंगहीन इत्यादिवरास दोष आसल्यास कन्येचा सप्तपदी पर्यंत विवाह होऊन नवऱ्याशी संग जालेली मात्र नसावी तीचा देखील दुसऱ्या नवऱ्याशी पुनर्विवाह संस्कार करावा मग पूर्ण विवाह न जालेलीचा पुनर्विवाह करावा हे सांगणेच नको॥ ॥ असा एक वेळ पुनर्विवाह विषय पूर्ण सांगितला असोन त्याचा या नियोग प्रकरणात पुनः प्रसंग येण्याचे कारण नाहीं. आणखी दुसरे कारण की हें नारदवचन, निर्विवाद, नियोगपर जीवसिष्ठ स्मृति, तिचे एकवाक्यतेनें नियोगपरच मानिले पाहिजे. तें असें की, नारदानीं नष्टे मृते या वचना पुढें. अष्टौ वर्षाण्यपेक्षेत ब्राम्हणी प्रोषितं पतिं॥ अप्रसूता तु चत्वारि परतोन्यं समाश्रयेत्॥१॥ इत्यादि वचनें करून ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, जातीचे स्त्रियांस परागंदा जाहलेल्या पतीचा पत्ता नसल्यास व पत्ता असल्यास वाट पहाण्याच्या मुदती सांगितल्या आहेत. तशाच वसिष्टानीं विधवेचा नियोग सांगून पुढें परागंदा जाहलेल्या पतीच्या स्त्रियांस नियोग करण्याकरितां त्यांनीं वाट पहाण्याच्या मुदती सांगितल्या आहेत. त्या अशा.

प्रेतपत्नी षण्मासान्व्रतचारिणी अक्षारलवणं भुंजानाधः शय्यीतोर्ध्वं षण्मासेभ्यः स्नात्वा श्राद्धं च पत्य

दत्वा विद्या गुरुयोनिसंबंधान् सन्निपात्य भ्रात्रा पित्रा वा नियोगं कारयेत् ॥ प्रोषितपत्नी पंच वर्षाण्युपासीतोर्ध्वं पंचभ्यो वर्षेभ्यो भर्तृसकाशं गच्छेत् ॥ यदि धर्मार्थाभ्यां प्रवासयितुकामानस्यात् यथा प्रेत एवं वर्तितव्यं स्यात् ॥ तदेवं ब्राम्हणी पंच प्रजाता अप्रजाता चत्वारीत्यादि॰

अर्थ- पुत्र उत्पन्न न करितां पति मरण पावल्यास, सहा महिने हविष्यान्न भक्षण करावें. व भूमीवर शय्या करावी. इत्यादि व्रतस्थ असून, नंतर पतीचें श्राद्ध करून, सर्व आपला गोतावळा जमा करून त्यांचे अनुमतानें भ्रात्याकडून अगर पित्याकडून नियोगाची आज्ञा घ्यावी. पति परागंदा जाहला असल्यास त्याचे स्त्रीनें पांच वर्षे वाट पाहून नंतर नियोग करावा पतिचा पत्ता असल्यास तो असेल तिकडे जावे. जाण्याची सोय नसेल तर विधवे प्रमाणें नियोग करावा; परंतु तो ब्राम्हण स्त्रीनें पुनः पांच वर्षे वाट पाहून करावा. प्रसूत जाहली नसेल तर तिणें चार वर्षे वाट पाहून. नंतर करावा. इत्यादि यांत उभयतांचे मुदती मध्यें मात्र फेर आहे तो असा की नारदमती ब्राह्मण स्त्री सपत्या नसेल तर ८ वर्षे पत्ता असेल तर १६ वर्षे व सिष्ठ मती पत्ता नसेल तर ५ वर्षे पत्ता असेल तर १० वर्षे येणे करून मुख्य नियोग विषयाचे एकवाक्यतेस प्रतिबंधक आहे असें नाहीं. कारण सर्व कर्मांत शाखा भेदें करून किंवा मत भेदें करून फार फेर असला तरी कर्माचें एकत्व मोडत नाहीं. हा मीमांसकाचा सिद्धांत आहे. (सर्व शाखा प्रत्ययं कर्मैक मिति.) आणखी तिसरें कारण असें कीं, जेथें स्मृतींत विवाह सांगितले तेथें. "विंदेत विवहेत्, उद्वहेत्, उपयच्छेत्," असे शब्द असतात. तसा येथें नाहीं. समाश्रयेत्. असें म्हटले आहे. यावरून तो विवाह नव्हे. आणखी चवथें कारण असें की पुत्रा करिता नियोगाची आज्ञा आहे त्या विषयीं प्रमाणें सदरी दाखविलींच आहेत मैथुनार्थ पुनर्विवाहाची आज्ञा आहे त्याविषयी प्रमाण. ब्रम्हांडपुराण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आदावूढा हिंसायेन तस्मा दन्य विवाहिता ॥ भोगैकसाधनं सा स्यात्न योग्या खिल कर्मसु ॥ अर्थ- जीचा एकवेळ विवाह जाहला आणि तो नवरा मेला किंवा गेला नंतर दुसऱ्याने तिच्याशी विवाह केला तर ती स्त्री फक्त मैथुनाचे उपयोगी धर्माचे व संततीचे उपयोगी नाहीं. ॥ हे बौधायन स्पष्ट सांगतात ॥ ॥ पुनर्भूस्त्रां गृहीत्वा न प्रजां न धर्मं विंदेत् ॥ ॥ अर्थ- जी पुनर्विवाह करण्यास प्रवृत्त जाहली तिच्याशी विवाह करून घेणाऱ्याने तीच्या साह्याने श्रौतस्मार्त कर्मे व प्रजोत्पादन करू नये, मैथुन करणे ते ऋतुकाल सोडून करावे. तशातून अदृष्टवशे करून पुत्र जाहल्यास तो कुंड गोलक नाव पावून वर्ण बाह्य होतो ॥ यास प्रमाण सह्याद्रिखंड ॥ ॥ ब्राह्मणी विधवा चैव पुनरूढा हि सा यदि ॥ पुनर्भूर्विन्द्यसौ प्रोक्ता भोगमात्र प्रयोजना ॥ तत्पुत्रश्चैव कुंड गोलः सर्वधर्मबहिष्कृतः अर्थ- विधवा ब्राम्हण स्त्रीचा पुनर्विवाह जाहल्यास ती पुनर्भू म्हणजे निंद्य होते ती केवळ मैथुनाचे उपयोगी जर तिजला कदाचित्पुत्र जाहल्यास तो कुंड गोलक नाव पावून वर्ण बाह्य होतो ॥ ॥ नारदही जीचा पुनर्विवाह करावयास सांगतात त्याच पुनर्विवाहीत स्त्रीस निंद्य म्हणतात ॥ ॥ कन्यैवाक्षतया निर्या पाणि ग्रहण दूषिता ॥ पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनः संस्कार कर्मणा ॥ अर्थ- ज्या कन्येचा पाणिग्रहण करणारा दूषित म्हणजे उन्मत्तादि दोषयुक्त असोन न कळता विवाह जाहला अगर विवाह जाहल्या नंतर दोषयुक्त जाहला परंतु त्याशी संग मात्र जाहला नाहीं ती कन्या विवाह न जाहलेल्या कन्ये सारिखीच समजावी तीचा पुनः दुसऱ्याशी विवाह संस्कार जाहल्यास ती एक पुनर्भू जाणावी अशा अणखी दोन प्रकारच्या पुनर्भू व च्यार प्रकारच्या व्यभिचारिणी सांगोन यासात जणी पर पूर्वस्थियास नारदानी शेरा मारिला आहे की ॥ ॥ पूर्वे पूर्वा जघन्यासां श्रेयसी तूत्तरोत्तरा ॥ अर्थ- या तिघी पुनर्भू मध्ये पहिली तर फारच निंद्य, ती पेक्षा दुसरी बरी, ती पेक्षा तिसरी बरी, व्यभिचारिणी मध्येंही असाच प्रकार समजावा, असी नारदानी पुनर्विवाहित स्त्रीस निंद्यता सांगित-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ली आहे, तेव्हा पुनर्विवाहाने स्त्री निंद्य होती व संतती कुंड गोलक होती असे असून नारद या प्रकरणाचे शेवटी हा संतत्यर्थ पर पुरुष गमन प्रकार निर्दोष म्हणोन सांगतात ते असे॥ प्रजाप्रवृत्तौ नारीणां वृत्तिरेषा प्रजापतेः॥ अतोन्यगमने स्त्रीणामेष दोषो न विद्यते॥ अर्थः- प्रजावृध्दि इच्छिणारा जो ब्रम्हदेव त्याचा स्त्रियास वृत्ति म्हणजे वर आहे की प्रजोत्पादना पुरता पर पुरुष संग करावा, याकरिता प्रजोत्पत्ति साठी त्यांणी पर पुरुष संग केल्यास दोष नाहीं. त्याचे स्वाध्वीपणास बाध एते नाहीं. जशा कुंती मदयंती प्रभृति आणि पुत्रही योग्य होतात. जसे धृतराष्ट्र पांडु युधिष्ठिर प्रभृति. क्वचित नारद संहितेचे पुस्तकांत सदर वचनाचे पूर्वार्ध॥ अप्रवृत्तौतु मुतानां दृष्टिरेषा प्रजापतेः॥ असे आढळते, परंतु तो अपपाठ समजावा, कारण कल्पतरु व शुद्र कमळाकरादि प्रामाणिक ग्रंथात प्रजाप्रवृत्तौ हाच पाठ घेतला आहे. यावरून हे नियोग प्रकरणच पुनर्विवाह प्रकरण नव्हे यात तिळमात्र संदेह नाहीं.

पति मरण पावल्यास स्त्रियांस धर्म दोन, एक सहगमन करावें म्हणजे सती जावें. अगर रजोदर्शन जाहलें नाहीं, किंवा गर्भिणी आहे, किंवा मूल लहान आहे, किंवा धैर्य नाहीं इत्यादि ब्रम्हवैवर्त पुराणात सांगितलेले सहगमनाचे प्रतिबंध असल्यास, सती न जातां केशवपनादि वैधव्य धर्मानें यावज्जीव रहावें हा दुसरा धर्म. यास प्रमाणें.

मनुः

ब्रम्हचर्यं चरेद्वापि प्रविशेद्वा हुताशनं॥

अर्थः- पति मरण पावल्यास, ब्रम्हचर्यानें रहावें. किंवा अग्नींत सोचे वरो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वर प्रवेश करावा.

ब्रम्हवैवर्तपुराणे.

सहानुगमनं शस्तं वैधव्यस्यापि पालनं ॥

अर्थ- पति मरण पावल्यास सती जाणें किंवा वैधव्य धर्म रक्षण करणे हें दोन मार्ग प्रशस्त आहेत.

पुनर्विवाह करणें असा तिसरा एक मार्ग आहे परंतु तो मरण निमित्त कच आहे असें नाहीं. तर त्याची निमित्तें पुनर्विवाह वचनांत बहुत आहेत त्यांत प्रकार दोन.

पहिला प्रकार.

ज्यांच्या योगानें कन्येची सर्वस्व हानी होत नाहीं. ती, अल्पपति समजावी.

१ पति निंद्य कर्म करणारा.
२ पति वेडा जाहलेला.
३ पति कोड भरलेला.
४ पति आंधळा.
५ पति बहिरा.
६ पति कुरूप.
७ पति फेंपऱ्या
८ पति सोंगाड्या
९ पति मुका.
१० पति अतिदूर देशीं राहणारा.

दुसरा प्रकार.

ज्यांच्या योगानें कन्येची सर्वस्व हानी होंये. ती, महापति समजावी.

१ पति मरण पावला.
२ पति परागंदा जाहला
३ पति संन्यासी जाहला.
४ पति नपुंसक निघाला.
५ पति बाटला.
६ पति महारोगी जाहला
७ पति सगोत्र निघाला.
८ पति सप्रवर निघाला.
९ पति जन्मठेप जाहलेला.
१० पति शूद्रापुत्र निघाला.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

११ पति कुलशील विहीन.

१२ पति युद्धैकनिष्ठ.

१३ पति अन्यजातीय. म्हणजे

द्रविडास गौड. गौडास गुर्जर इत्यादि.

हीं कारणें उपस्थित जाहलीं म्हणजे पुनर्विवाह करावा. तो दोन प्रकारचा, एक सप्तपदीचे पूर्वी दुसरा सप्तपद्यनंतर. सप्तपदी म्हणजे, विवाह प्रयोगांत शेवटचें एक कर्म आहे, तें असेंकीं, वधूवरानीं अग्नीचे सन्निध सात पावलें चालावें.

सप्तपदीचे पूर्वील विवाहास प्रमाण.

याज्ञवल्क्य.

दत्तामपिहरेत्कन्यां श्रेयांश्चेद्वर आव्रजेत्॥

अर्थ- ज्या वरास कन्या वाग्दत्त जाहली नंतर तो वर दुष्ट लक्षण आहे, असें उमगलें, आणि सुलक्षण दुसरा मिळेल तर पहिल्यास न देतां दुसऱ्यास द्यावी.

महाभारते दानधर्मे युधिष्ठिरः

कन्यायां प्राप्तशुल्कायां श्रेयांश्चेद्वर आव्रजेत्॥ धर्मार्थ कामसंपन्नो वाच्यमप्यनृतं नतत्॥१॥ कन्यायां प्राप्त शुल्कायां शुल्कदः प्रशमं गतः॥ पाणिग्रहीता चान्यः स्यादत्रनो धर्मसंशयः॥२॥

अर्थ- कन्येचें वाग्दान जाहलें, आणि तो वर लक्षणहीन असून लक्षण संपन्न दुसरा मिळेल तर खोटें बोलावें किंवा कसें? किंवा वाग्दान ज्यास केलें तो म-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रण पावला तर दुसरा नवरा होईल किंवा नाहीं? याविषयीं आम्हास संशय आहे तर कसे करावे ती आज्ञा करावी.

याचे उत्तर.

भीष्म उवाच ॥ यत्रेष्टं तत्र देयं स्यान्नात्र कार्या विचारणा ॥ कुर्वते जीवतो ह्येवं मृते नैवास्ति संशयः ॥ १ ॥
देवरं वा विशेत्कन्यात प्येद्वापि तपः पुनः ॥ तस्मात्पाणि ग्रहणात्पूर्वं मंतरं यत्र वर्तते ॥ सर्व मंगल मंत्रं चेन्मृषावादस्क पातकः ॥ २ ॥

अर्थ- सप्तपदी होण्याचे पूर्वींचे अवकाशांत कन्या ज्यास वाचा दत्त केली, तो जीवंत असून दुर्लक्षण आहे तर दुसऱ्यास खुशाल द्यावी. मग मेल्यावर तर विचारावयास नको. अथवा मेल्या वराचे भावाशीं नियोग करावा किंवा लग्न न करितां ज्यास दिलें त्याचीच म्हणवून तपस्वी व्हावें. लग्नाचे सप्तपदींत सर्व मंत्र जाहल्यावर फिर वील तर पातक घडेल.

पूर्वी दिवोदास राजाची कन्या दिव्यादेवी, तिजला योजिलेला नवरा चित्रसेन अक्षता टाकणे समयीं मरण पावला. नंतर त्या राजानें ब्राम्हणास विचारिलें ते

पद्मपुराणे.

अस्या विवाहकाले तु चित्रसेनो दिवं गतः ॥ अस्यास्तु कीदृशं कार्यं भविष्यति वदंतु नः ॥ १ ॥

अर्थ- कन्येचा नवरा अक्षता टाकण्या समयीं मरण पावला. आतां इची पुढें वाट काय ती सांगावी.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याचे उत्तर.

ब्राम्हणा ऊचुः ॥ विवाहो जायते राजन् कन्यायास्तु वि
धानतः ॥ पतिर्मृत्युं प्रयात्यस्या नो वा संगं करोति च ॥१॥
महाव्याध्यभिशस्तश्च त्यागं कृत्वा प्रयाति च ॥ प्रव्राजि
तो भवेद्राजन् धर्मशास्त्रेषु दृश्यते ॥ २ ॥ अनुद्वाहित
कन्याया विवाहः क्रियते बुधैः ॥ अस्यां राजन् स्वरूपायां
चेत्पतिरन्यो विधीयते ॥३॥ विवाहं तु पिता कुर्याद्वि
धानेन न संशयः ॥ इत्थं राजन् समादिष्टं धर्मशास्त्रा
र्थकोविदैः ॥ विवाहः क्रियतामस्या इत्यूचुस्ते द्विजो
त्तमाः ॥४॥

अर्थ- हे राजन् ज्या कन्येचा पति मरण पावला. किंवा जिवंत असून संग करण्याचें सामर्थ्य नाहीं म्हणजे नपुंसक निघाला, किंवा व्याधिग्रस्त झाला, किंवा पतित जाहला किंवा टाकून गेला म्हणजे परागंदा जाहला, किंवा संन्यासी जाहला, त्या कन्येचा, तु म्हणजे पुनः विवाह होतो, असें धर्मशास्त्रांत आढळतें त्यांत सप्तपदीचे पूर्वीं तर सदर निमित्तास पुनर्विवाह करण्याची चाल आहे, आतां जिचा सप्तपर्यंत विवाह होऊन रजोदर्शन झालें पति संग मात्र नाहीं, त्याही स्त्रीचा तिचे पित्यानें अन्य पतिशीं पुनः विवाह करावा असेंही धर्मशास्त्री म्हणतात तुझे तर कन्येचा सप्तपर्यंत कांहीं संस्कार जाहला नाहीं तेव्हां तिचा पुनर्विवाह खुशाल कर असें ब्राम्हणानीं सांगितलें. हा पद्म पुराणाचा पाठ गोंई क्षेत्रांत रास्ते यांचे घरीं दोन पुस्तकें आहेत त्यांत व आंध्र व द्रविड लिपिचे व अन्यत्रही शोधिलेलें पुस्तकांत आढळला तो घेतला आहे ॥ ॥ सदर वचनांत अस्याः या पदचा अर्थ। या कन्येचा असा प्रसिद्ध असोन ज्या कन्येचा असा लिहिला तो ही प्रामाणिकच आहे ॥ असेंकी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तदस्यास्त्यस्मिन्निति मतुप्॥ या व्याकरणसूत्री। एलछड्।
यछद्यार्थक हे। सर्व वैय्याकरणास मान्य आहे॥

रासपर्यंत विवाह जाहला असला तरी ही स्त्रिया
चा पुनर्विवाह होतो यासप्रमाणे.

वसिष्ठः

पाणिग्राहे मृते बालाके वलं मंत्र संस्कृता॥ साचेद
क्षतयोनिः स्यात् पुनः संस्कारमर्हति॥१॥

अर्थः- जिचा विवाह मात्र जाहला, आणि पतिसंग जाहला नाहीं, तिचा
नवरा मेला असतां पुनर्विवाह होतो.

नारदः

उद्वाहिता पिया कन्या नचेत्संप्राप्तमैथुना॥ पुनःसं
स्कारमर्हतयथा कन्या तथैवसा॥१॥

अर्थः- जिचा विवाह मात्र झाला पतिसंग घडला नाहीं, तिचा पति
मेला, किंवा गेला इत्यादि कारणे उपस्थित जाहली असतां पुनर्विवाह
करावा; ती लग्न न जाहलेले कन्ये सारखीच समजावी.

शातातपः

समाच्छिद्य बलात्कन्यां पापादक्षतयोनिकां॥ पुन
र्गुणवते दद्यादिति शातातपो ब्रवीत्॥१॥

अर्थः- ज्या वरोवर विवाह जाहला तो नवरा दुर्गुणी असल्यास त्यापासून

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कन्या, हिराऊन घेऊन, दुसऱ्या गुणवानाशीं तिचा पुनर्विवाह करावा.

बौधायनः

भुक्ता गृहीतगर्भा प्रसूताचेति॥

अर्थ- पुरुषसंग झाहलेली, गर्भिणी झाहलेली, व प्रसूत झाहलेली ही स्त्री पुनर्विवाहास योग्य होते.

विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह करणे विषयीं माधवानी लिहिले ते.

मनुवचन

नष्टेमृतेप्रव्रजितेक्लीबेचपतितेतथा॥ पंचस्वापत्सुनारीणांपतिरन्यो विधीयते॥१॥

अर्थ- पति परागंदा झाहला, पत्ता नाहीं, किंवा मेला किंवा संन्यासी झाहला, किंवा नपुंसक निघाला, किंवा बाटला, या पांच आपत्ति आल्यास विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह होतो. पांच म्हटले ही संख्या अदमासाची आहे खचीत नव्हे. कारण नारद व कात्यायनानीं दुसरीं हीं कारणें दाखविलीं आहेत.

कात्यायनः

सतुयद्यन्यजातीयःपतितःक्लीबएववा॥ विकर्मस्थःसगोत्रोवादासोदीर्घामयोपिवा॥ ऊढापिदेयाचान्यस्मैसहावरणभूषणा॥१॥

अर्थ- विवाह झाहलेला नवरा जर, द्रविडास गुर्जर असा भिन्न जा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तीचा, किंवा बाटलेला, किंवा नपुंसक निघाला, किंवा निंद्य कर्म करणारा किंवा सगोत्र, किंवा दासी पुत्र. किंवा महारोगी निघेल तर, ती विवाह जाहलेली ही कन्या दुसऱ्या नवऱ्यास लिला पहिले नवऱ्यानें दिलेल्या वस्त्र भूषणासुद्धां द्यावी

हा विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह केलाच पाहिजे असें नाहीं पाहिजे असल्यास करावा; असा वैकल्पिक आहे.

स्मृत्यर्थसारे

पुरा पुरुषसंयोगान्मृतेदेये तिकेचन॥ प्राग्गर्भधारणात्कन्या मृतेदेये तिचापरे॥१॥

अर्थ:- विवाह होऊन पुरुषसंग जाहला नसल्यास, किंवा संग होऊन गर्भिणी जाहली नाहीं तिचाही पुनर्विवाह करावा असें कोणी म्हणतात कितीएक तें मान्य करीत नाहींत, एवंच विहित प्रतिषिद्धत्वास्तव ऐच्छिक आहे.

यांतील सारांश

सदरीं लिहिलेलीं निमित्तें उपस्थित जाहल्यास सप्तपदीच्या पूर्वीं व सप्तपदी जाहल्या नंतर ही इच्छा असल्यास पुनर्विवाह होतो.

वर लिहिलेला पुनर्विवाह प्रशस्त आहे किंवा निंद्य आहे याचा विचार पाहतां निंद्य आहे असें दिसतें यास प्रमाणे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

बृहत्पाराशरः

स्त्रीणामुद्वाह एकोवैवेदोक्तः पावनो विधिः ॥

अर्थ:- स्त्रियांचा प्रथम विवाह वेदोक्त विधि पावन आहे, अर्थात दु-सरा विवाह अपवित्र असें होते.

धर्मसूत्रे आपस्तंबः

यान्यपूर्वान्यमुद्वहते सा पुनर्भूः॥

अर्थ:- जी एका नवऱ्याची अंकित होऊन पुनः दुसऱ्याशीं लग्न करि-ते ती पुनर्भू म्हणजे निंद्यता पावते.

अपरार्के हारीतः

स्वैरिणीच पुनर्भूश्च स्वैरेतो धाः कामाचारिणी॥
सर्वभक्षाच पंचैताः शूद्रयोन यई रिताः ॥१॥

अर्थ:- स्वैरिणी म्हणजे नवरा टाकून विवाह न करितां स्वजातीचे पर पुरुषाशीं रत होते ती, पुनर्भू म्हणजे पुनर्विवाह केलेली, जिणें पुनर्विवाह न करितां नवरा चोहून अधिक स्वजातीचे परपुरुष भोगिले ती रेतोधाः, जी स्वजातीचा नेमन ठेवितां यथेच्छ पर पुरुष भोगिल्ये ती कामचारिणी, जी मद्य, मांसादि सर्व अभक्ष्य भक्षिले ती सर्व भक्षा, या पांच स्त्रिया तारतम्यानें शूद्री प्रमाणें मानाव्या.

पुनर्विवाह अप्रशस्त खरा परंतु त्यांत सप्तपदीचे पूर्वींच्या पुनर्विवाहानें पुनर्भूत्व येत असून दोष नाहीं. यास प्रमाण.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

महादोषेस्तुविज्ञाते पूर्वं सप्तपदीविधेः ॥ मरणा
दौ समुत्पन्ने दद्यान्यस्मै न दोषभाक् ॥ १ ॥

अर्थः- सप्तपदीचे पूर्वी वाग्दत्त कन्येस वराची अंध, बधिरादि अत्या-
पत्ति किंवा मरणादि महापत्ति, प्रसक्त जाहल्यास ती कन्या, द्योतका रानीं
प्रायश्चित्त सांगितलें आहे. ते तिचे हातून करवून दुसऱ्यास द्यावी,
ती दोषवती होत नाहीं. परंतु तीचा पुत्र दुर्ब्राम्हण होईल यास प्रमाण.

शौनकपरिशिष्टे.

पुनर्विवाहिता कन्या प्राक्सप्तपदकर्मणः ॥ दु
र्ब्राम्हणः स्मृतस्तस्याः कृतायामपि निष्कृतौ ॥ १ ॥

अर्थः- सप्तपदी पूर्वी जिचा पुनर्विवाह प्रायश्चित्त पूर्वक जरी केला त-
थापि तिचा पुत्र दुर्ब्राम्हणत्व पावेलच पावेल.

त्या दुर्ब्राम्हणास व इतर स्वब्राम्हणास के
र कितीहे त्रिकांडमंडन सांगतात.

वेदो वेदिश्च विच्छिन्नाउभौ यस्य त्रिपूरुषं ॥ दुर्ब्रा
म्हणः स विज्ञेयः पुनर्भूतनयो पिच ॥ १ ॥ यो सौ
दुर्ब्राम्हणः सोमं पिपासतिस आदितः ॥ आल
भेता श्विनं धूम्रललामं छागरुं पशुं ॥ २ ॥

अर्थः- ज्याचे त्रिपुरुषांत वेदाध्ययन व अग्निहोत्र नाहीं तो एक, व
दुसरा पुनर्भूचा पुत्र हे दुर्ब्राम्हण होतात, याणीं सोमयाग करणें ज्या-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हल्यास प्रायश्चित्तार्थ अगोदर अश्विनी कुमार देवताक धूम्रवर्ण बोकड जातीचा पशु केला पाहिजे. पुनर्भू पुत्राचे त्रिपुरुषांत वेदवेदी जरी असेल तथापि त्याला केलाच पाहिजे. इतकाच फेर आहे, वरकड फेर नाहीं. यावरून सप्तपदीचे पूर्वीची पुनर्भू धर्म कार्यास व संततीस योग्य आहे असें सिद्ध होतें.

अता सप्तपदीपर्यंत संस्कार जाहलेले स्त्रीचा पुनर्विवाह जाहल्यास दोष फार सांगितले आहेत तें असे

वसिष्ठः

मृते भर्तरि नारीणां ब्रम्हचर्यं यथोक्तवत् ॥ अग्निप्रपतनं वापि नान्यदस्ती ह धर्मतः ॥१॥

अर्थ:- भर्ता मरण पावल्यास स्त्रियांनीं केशवपनादि सहित ब्रम्हचर्यानें रहावें किंवा सती पडावें. या दोन प्रकारांशिवाय तिसरा प्रकार धर्मतः नाहीं, तर तो अधर्म आहे म्हणजे अनर्थ कारी आहे.

धर्माचें स्वरूप पूर्व मीमांसेंत जैमिनीनीं सांगितलें आहे तें असे

सूत्र.

चोदनालक्षणोर्थोधर्मः॥

अर्थ:- शास्त्रानें करावयास सांगितला तो धर्म, परंतु तो अर्थ पाहिजे,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

म्हणजे त्यांत अनिष्ट असूनये. शास्त्रानें सांगितलें असून जर त्यां- त अनिष्टही सांगितलें आहे तर तो अधर्म होय असें समजावें.

जसें.

श्येनेनाभिचरन्यजेत॥

अर्थः- ज्यास आपला शत्रु मरावा अशी इच्छा असेल, त्याणे श्येन या नावाचा यज्ञ सांगीतला आहे तो करावा शत्रु मरेल.

परंतु.

रौरवंलाभिचारिकी॥

अर्थः- अभिचार म्हणजे दुसऱ्याचे प्राण घेणेचें कर्म जो करील तो रौरव या नावाचा नरक पावेल.

जेव्हा श्येन याग करण्याची परवानगी दिली आणि त्यास दोषही सांगितले तेव्हा तो अधर्म यास्तव दोष पतकरून करणे असल्यास करावा तसा विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह दोष पतकरून करणे असल्यास करावा.

विवाहित स्त्रीचे पुनर्विवाहास दोष आहे तें.

कात्यायनः

गात्रं गोत्रं परित्यज्यनारीयद्यन्यदाश्रयेत्॥
निंद्येवसातत्रलोकेपरपूर्वेतिचोच्यते॥१॥

अर्थः- स्वगोत्रात भ्रष्ट झाल्यावर ते नारी विवाह सप्तमे पदे या वच-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ना धारे सप्तपर्यंत विवाह जाहला म्हणजे पहिलें गोत्र सुटलें. तेव्हां जी भर्त्याचें गोत्र सोडून दुसरे गोत्रांत जाते म्हणजे पुनर्विवाह करते ती स्त्री फार निंद्य होते. तिजला परपूर्वा म्हणजे पुनर्भू असें म्हणतात.

अपरार्के हारीतः

स्वैरिणीच पुनर्भूश्चरेतोधाः कामचारिणी॥
सर्वभक्षाच पंचैताः शूद्रयोनयर्दरिताः॥१॥

अर्थः- स्वैरिणी व पुनर्भू म्हणजे एकवेळ सप्त पर्यंत विवाह होऊन पुनः दुसऱ्यानें विवाह केलेली वरेतोधा व कामचारिणी व सर्वभक्षा अशा पांच स्त्रिया शूद्रिणी प्रमाणें समजाव्या, म्हणजे धर्माचे व प्रजेचे उपयोगी नाहींत. स्वैरिण्यादिकाची लक्षणे मागे ३४ पृष्ठावर लिहिली आहेत ती पहावी.

बृहत्पराशरः

अन्यदत्तातुयाकन्यापुनरन्यत्रदीयते॥त
स्याश्चेवनभोक्तव्यंपुनर्भूःसाप्रकीर्तिता॥१॥

अर्थः- एकाशीं विवाह जाहलेली स्त्री दुसऱ्याशीं पुनर्विवाह करील तर ती पुनर्भू होते तिचे हातचें जेऊं नये.

बृहत्पराशरः

यःस्वैरिणीनांच पुनर्भूवांचयःकामचारि
द्विजयोषिच॥रेतोधृतांपाकमनापदद्या
द्विप्रःसचांद्रव्रतकृद्विशुध्येत्॥१॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ- जो आपत्काळ नसोन स्वैरिणी व पुनर्विवाह केलेली व काम चारिणी वरे तो धा याचे हातचे जेवील तो चांद्रायण प्रायश्चित्तानें शुद्ध होईल १

स्मृत्यर्थसारे.

आपदि सांतपनमिति॥

अर्थ- आपत्काली सदरस्त्रियाचे हातचे जेवल्यास सांतपन प्रायश्चित्तानें शुद्ध होईल.

पराशर पुराण.

पुनर्भुवो तिलुब्धस्य विधवोढस्य मोहितः॥
पितृ नस्य तथा शुल्का वत्सरात्स नितो भवेत्॥१॥

अर्थ- जिचा एकवेळ विवाह जाहला असून पुनः केला तिचे, व अति कृपणाचें, व ज्याणें विधवेशीं विवाह केला त्याचें, व दुसऱ्याचें पैकन्य पाहतो त्याचें अन्न वर्षभर जेवल्यास पतितत्व येतें. त्यास प्रायश्चित्त नाहीं

ब्रम्हपुराणे.

परपूर्वा यस्य गेहे भार्या स्यात्तस्य नित्यशः॥
अशौचं सर्व कार्येषु देहे भवति सर्वदा॥१॥

अर्थ- एक नवरा करून पुनः जी दुसरा करते, ती परपूर्वा म्हणजे पुनर्भू होते, ती ज्याचे घरीं बायको त्याचा देह अपवित्र असतो तो सुतक्या प्रमाणें दान प्रतिग्रहाचे उपयोगी नाहीं.

बोधायनः

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुनर्भूस्त्रीं गृहीत्वा वृथाकारी स्यान्न धर्मेन प्रजां विंदेत् ॥

अर्थ- पुनर्भूस्त्री श्रौत, स्मार्त कर्माचें व प्रजोत्पादनाचें उपयोगी नाहीं.

ब्रम्हांड पुराणे.
ललितोपाख्याने.

आदावुद्वाहिता येन तन्नाशेन्यविवाहिता ॥ भो
गैकसाधनं सास्यान्नयोग्याखिलकर्मसु ॥ १ ॥

अर्थ- ज्याशीं विवाह जाहला तो मेला, किंवा गेला यास्तव दुसऱ्याशीं पुनर्विवाह केला, ती स्त्री फक्त मैथुनाचे उपयोगी, श्रौत, स्मार्त कर्मे व संतती वगैरे यांचे उपयोगी नाहीं.

सह्याद्रिखंडे.

ब्राम्हणी विधवा चैव पुनरुद्वाहिता यदि ॥ पुन
र्भाविन्यसौ प्रोक्ता भोगमात्र प्रयोजना ॥ तत्पु
त्रश्चैव कुंड गोलः सर्वधर्मबहिष्कृतः ॥ १ ॥

अर्थ- ब्राम्हण जातींचे गतभर्तृकेचा पुनर्विवाह केल्यास ती पुनर्भू होते, ती केवळ मैथुनाचेच उपयोगी, तिजला अदृष्ट वशें करून पुत्र जाहल्यास तो वर्णाश्रम बाह्य कुंड गोलक या नांवाचा समजावा.

दानमयूखधृतपरिशिष्टे.

रतिभार्या परपूर्वा प्रतिगृह्णीत चाक्षतां ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ- ज्या स्त्रीस एक नवरा होता ती पुनर्विवाह करूं लागल्यास तीचा प्रतिग्रह करणे तो मस्तक स्पर्शरूप करावा. ती रति भार्या म्हणजे फक्त मैथुनाचेच उपयोगी यास्तव तिजबरोबर ऋतुकाळीं संग करूं नये, कारण पुत्रोत्पत्ति होईल. तशांतून अदृष्टवशात् जर पुत्र जाहला तर त्याविषयीं.

बृहत्पराशर:

आसन्पुत्राश्च ये जातास्तेऽहव्यकव्ययोः॥
तथैव तासां पतयो वर्जनीयाः प्रयत्नतः॥१॥
वर्णाश्रमबहिष्ठास्ते संकीर्णजन्मसंभवाः॥ मा
तृणां च पितॄणां च त्रयाणां न च पिंडदाः॥२॥

अर्थ- पुनर्भू सैरिण्यादिकांस पुत्र जाहल्यास त्यांजला व त्यांचे पतीस श्राद्ध पक्षांत ब्राम्हण सांगूं नये, ते पुत्र वर्णाश्रम बाह्य गोळकासारखे समजावे. त्याणीं मातापितरांचें श्राद्ध एकोद्दिष्ट विधीनें करावें. कारण आजा, आजी, पणजा, पणजी, शुद्ध असल्यानें त्यांशीं भ्रष्ट जाहलेले मातापितरांची सपिंडी होणार नाहीं, तेव्हां एकोद्दिष्ट विधीनें केलें पाहिजे.

पुनर्भूचे पुत्र व पुनर्भूचे पती श्राद्धास मात्र सांगूं नयेत. येऱ्हवी समाराधनेस वगैरे सांगण्यास काय बाध आहे, असें म्हणावें तर नव्हे असें विपर्यीं.

हारीत:

एतासां यद्यपत्यानि उत्पद्यंते कदाचन॥ न ता
नृपंक्तिं प्रयुंजीत न ते पंक्त्यर्हकाः स्मृताः॥१॥

अर्थ- पुनर्भू स्वैरिण्यादिकांस कदाचित् पुत्र जाहल्यास ते व त्यांचे मा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ता पितर हे त्रिवर्ग अर्पात्त होतात त्यास पंक्तिस घेऊं नये.

पुनर्विवाहाची स्त्री फक्त मैथुनाचेच उपयोगी असें सांगितलें परंतु तें मैथुनही प्रथम विवाहाचे स्त्री प्रमाणें निर्दोष नाहीं याविषयीं.

आपस्तंब धर्मसूत्रे.

पूर्ववत्यामसंस्कृतायांवर्णांतरेच मैथुनेदोषस्तत्रापिदोषवान्पुत्र एव ॥

अर्थ— जिला पूर्वी एक नवरा होता ती आपण जरी विवाह करून घेतली, व जिला पूर्वी नवरा ही नाहीं आणि आपलेशी विवाह ही जाहला नाहीं. व जिला पूर्वी नवरा नसून आपल्याशी विवाहही जाहला परंतु शूद्र जातीची आहे, तर अशा तिघी बरोबर मैथुन केल्यास दोष आहे, तशांतून पुत्र जाहल्यास फारच दोष. तेव्हां वरकी, नायकिणी, कसबिणींचे मैथुनापेक्षां पुनर्भूचे मैथुनास दोष कमी, कारण कांहीं मंत्र संस्कार होतो.

यांतील तात्पर्य.

पुनर्विवाह करण्यास सांगुन त्यास दोषही सांगितले तेव्हां तो धर्म नव्हे, श्येनयागासारखा अधर्म होय. तेव्हां सांगितले दोष पतकरून करणें तर करावा.

आतां या प्रकरणांत कोणाच्या शंका आहेत त्या शंका व त्यांचें निराकरण खालीं लिहितो.

पहिली शंका.

१ मत्त पत्यंतर पुनर्विवाह करावा. असें शास्त्रच सांगत असून त्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

दोष आहेत हें म्हणणें नीट नाहीं तस्मात्, ज्या निमित्तास पुनर्विवाह करण्याची आज्ञा आहे त्याखेरीज निमित्तास जर पुनर्विवाह केला तरच पुनर्भूत्व व तत्प्रयुक्त दोष येतील असें कोणाचें म्हणणें आहे

परंतु तें युक्त नव्हे.

कारण माग.

३९।४० पृष्ठावर लिहिलेले "पराशर पुराणांत पुनर्भूर्वेति कुल्यस्य विधवो ढस्या ब्रम्हांड पुराणांत आदावुढा हिता येन तभ्यारोऽसह्याद्रि खंडांत ब्राम्हणी विधवा चैवा जी स्त्री नवरा नपुंसक निघाला किंवा बाटला किंवा वेडा जाहला किंवा मेला तर दुसऱ्याशीं पुनः विवाह करिते ती पुनर्भू होते या अर्थाचे. या वाक्लीबं पतितं मुन्मुत्तं वा भर्तार मुत्सृज्यान्यं पतिं विंदते मृते वासा पुनर्भूर्भवति. या वसिष्ट स्मृतींत वजि नवरा नपुंसक निघाल्यास तो सोडून दुसऱ्याशीं पुनः विवाह करिते ती पुनर्भू होते तिजला पुत्र जाहल्यास तो पौनर्भव होतो या अर्थाचे क्लीबं त्यक्त्वा यान्यं पतिं विंदेत्तस्यां पुनर्भ्वां जातः पौनर्भवः, या बौधायन सूत्रांत शास्त्रानें सांगितलेले निमित्ताचेच पुनर्विवाहास दोष व पुनर्भूत्व सांगितलें आहे तस्मात् तें म्हणणें युक्त नव्हे.

दुसरें अणखी कारण

असें कीं.

जर शास्त्राज्ञेचे विवाहानें पुनर्भूत्व येत नाहीं, तर तशा ठिकाणीं पुनर्भूत्वाचा निषेध सांगणें नको तें असें कीं, कन्येस बालवैधव्य योग असल्यास कुंभाशीं विवाह करून नंतर मनुष्याशीं विवाह करावा, व ज्येष्ठाचें लग्न न होतां कनिष्ठाचें जाहलें तर ज्येष्ठाचे आज्ञेनें कनिष्ठानें वरिलेले स्त्रीशींच पुनर्विवाह करून घ्यावी, व जीवंत पति असून मृतवार्ता आली आणि त्याचे स्त्रीनें वैधव्य स्वीकारिलें, नंतर पति आला तर त्याच्याशीं तिणें पुनर्विवाह करावा. व कुमुहूर्तावर विवाह जा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हल्यास क्रमुहूर्तावर पुनः करावा. हे पुनर्विवाह शास्त्राज्ञेने आहेत तेव्हां येथे पुनर्भूत्व येणारच नाहीं मग शास्त्रकार निषेध कां सांगतात.

तेअसे.

विधानखंडे.

स्वर्णांबुविप्रकादीनां प्रतिमाविष्णुरूपिणी ॥ तयासह विवाहेतु पुनर्भूत्वं न विद्यते ॥ १ ॥ विधानसारे ॥ कुंभादिभिः सहोद्वाहे लयैवपरिवेदने ॥ मृतागते च दुर्लग्ने पुनर्भूत्वं न विद्यते ॥ १ ॥

तस्मात् आज्ञेचा जरीं पुनर्विवाह झाला, तथापि पुनर्भूत्व येतें तें सदर ठिकाणीं प्राप्त होईल म्हणून त्याचा निषेध सांगितला. तेव्हां पुनर्विवाह जाहला कीं, पुनर्भूत्व येतें हें म्हणणें युक्त आहे.

याज्ञवल्क्यः

अक्षताचक्षताचैव पुनर्भूः संस्कृता पुनः ॥ स्वैरिणीतु पतिं हित्वा सवर्णं कामतः श्रयेत् ॥ १ ॥

अर्थ:- ज्या स्त्रीचा विवाह होऊन पतिसंग घडो अगर न घडो तिचा विवाह रूप पुनःसंस्कार जाहल्यास ती पुनर्भू होते, व जी पतिचा परित्याग करून विवाह न करितां स्वजातीचे परपुरुषाशीं संग करून राहते ती स्वैरिणी.

स्मृतिसारसंग्रहे.

सधवा विधवा चापि अक्षता नक्षता पिवा ॥ पुनर्विवाहिता नारी पुनर्भूरिति कीर्तिता ॥ १ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ:- स्त्री सधवा किंवा विधवा, अगर पतिसंग जाहलेली किंवा न जाहलेली असो पुनर्विवाह जाहला म्हणजे ती पुनर्भू होते.

दुसरी शंका अशी कीं.

लक्षणसंपन्न वरासीं लग्न जाहलें असून ती जर दुसऱ्यास दिली तर ती पुनर्भू होते तिजला सदरचा दोष आहे, असें कित्येकांचे म्हणणें.

परंतु ते युक्त नव्हे कारण.

अशा ठिकाणीं शास्त्रकार पुनर्भू शब्द देत नाहींत जारिणी पांसुला हे शब्द देतात.

यास प्रमाण प्रायश्चित्तहेमाद्रौ.

गौतमः॥ पूर्वमुद्वाहितां कन्यां मन्यस्मै धनकाम्यया॥ मत्सराद्वापि राजेंद्र दद्याद्विप्रो मदातुरः॥ १॥ दातुः शुद्धिः करीषाग्नेः परिणेतुस्तथैं दवैः॥ सा कन्या जारिणी प्रोक्ता तत्सुतः कुंडसंज्ञकः॥ २॥ जाबालिः॥ पूर्वमुद्वाहितां कन्यां पिता भ्राता धनेच्छया॥ मत्सराद्वापि वाद्वेषादन्याधीनां करोति चेत्॥ महादोषमवाप्नोति पितरो यांत्यधोगतिं॥ १॥ दातुः शुद्धिः करीषाग्नेर्वोढुश्चांद्रायणत्रयैः॥ सा कन्या पांसुला ज्ञेया तत्सुताः कुंडसंज्ञिताः॥ २॥

अर्थ:- दिलेली कन्या धनलोभानें किंवा मत्सरानें किंवा द्वेषानें दुस-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ण्यास दिल्यास ती आरिणी व तिची संतती कुंड संज्ञक समजावी. कन्यादाता गोवध्या पेटविलेल्या खाईंत पडोन मरेल तर शुद्ध होईल. करून घेणारा तीन चांद्रायणानें शुद्ध होईल.

तिसरी शंका.

कोणी म्हणतात कीं, सप्तपदीचे पूर्वींचे पुनर्विवाहास कांहीं दोष नाहीं, आणि सप्तपद्युत्तरचे पुनर्विवाहास फार दोष, अशी निवड केली, ही बरोबर नाहीं. कारण, सप्तपदी पूर्वींही पुनर्विवाहास भयंकर दोष सांगितला आहे.

कश्यपः

सप्त पौनर्भवाः कन्या वर्जनीयाः कुलाधमाः॥ वाचा दत्ता मनोदत्ता कृतकौतुकमंगला॥१॥ उदकस्पर्शिता या च या च पाणिगृहीतिका॥ अग्निं परिगता या च पुनर्भूप्रभवा च या॥२॥ इत्येताः कश्यपेनोक्ता दहन्ति कुलमग्निवत्॥

अर्थ— मनानें दिलेली. १ वाग्दान केलेली. २ कंकण बांधलेली. ३ कन्यादान केलेली. ४ गृण्हामिते या मंत्रें करून पाणिग्रहण केलेली ५ लाजाहोम जाहलेली. ६ यासहा जणी जर पुनर्विवाह करण्यास उद्युक्त जाहल्या व पुनर्विवाह केलेल्या स्त्रीची कन्या, अशा सात कन्या अधम होतात. त्या करून घेऊं नयेत, जर करून घेतल्या तर कुलास अग्नि सारिख्या जाळतील; म्हणजे कुलास कलंक लावतील.

यावर उत्तर.

यांची उपपत्ती संस्कार द्योतार्थ दिनकर भट्टानीं कैमुतिक न्यायानें के-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ली आहे; ती अशीं कीं जसें वैद्यानें सांगितलें कीं, या रोगास फणसाचा वास देखील खपावयाचा नाहीं. तर, या सांगण्यांत वासावर तात्पर्य नाहीं. तर, फणसाचे गरे भक्षणावर मुख्य तात्पर्य आहे, तसें सप्तपदीचे पूर्वी पुनर्विवाह जाहलेल्या स्त्रिया कुलास दूषित करितील. मग, सप्तपद्युत्तर पुनर्विवाह जाहलेल्या काय करतील तें न जाणों, असें विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह न करण्यावर तात्पर्य आहे. वस्तुतः कश्यपानीं सांगितलेली पुनर्भूची कन्या, सप्तपदीचे पूर्वी पुनर्विवाह जाहलेल्या पुनर्भू स्त्रीचीसैर म्हणता येत नाहीं, कारण तिचे कन्या संततीस दोषच नाहीं पुत्रास मात्र दुर्बी म्हणत दोष येतो तो मागें सांगितलाच आहे, तेव्हां सप्तपद्युत्तर पुनर्विवाह जाहलेल्या पुनर्भूचीच म्हटली पाहिजे जी पतिता पासून जरी जाहली तथापि पतित होत नाहीं. यास प्रमाण वसिष्ठस्मृती अशी कीं पतितेनोत्पन्नः पतितो भवति अन्यत्र स्त्रियाः ॥ अर्थ:- पतिता पासून उत्पन्न जाहलेला पुत्र मात्र पतित होतो. कन्या पतित होत नाहीं. त्या कन्येस याज्ञवल्क्य व हारीत व बौधायन यांणीं सांगितलेले प्रायश्चित देऊन विवाह करून घ्यावी त्यास दोष नाहीं, असें प्रायश्चित्तरत्नादि ग्रंथांत लिहिलें आहे, तें प्रायश्चित्त न करितां जर विवाह करून घेईल तर कुल दूषित होईल, तसें प्रायश्चित न करितां वाग्दत्तादिकाशीं पुनर्विवाह करील तर त्यास दोष अन्यथा नाहीं असी उपपत्ति सरस होते.

असाच.
बौधायनानी.

वाचादत्ता मनोदत्ता अग्निं परिगता सप्तमं पदं नीता भुक्ता गृहीत गर्भा प्रसूता चेति सप्तविधा पुनर्भूस्तां गृहीतानृथाकारी स्यान्न धर्मं न प्रजां विंदेत्॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

या सूत्रांत आलीही पुनर्विवाहीत स्त्रिया धर्मास्तव प्रजेचे उपयोगी नाहीं त म्हणून सर्वांस मारखाने जो दोष सांगितला, तोही वाग्दत्तादि स्त्रिया त्राय स्त्रिया न करितां पुनर्विवाह करतील तर त्यास समजावा.

शूद्र व संकीर्ण जाति म्हणजे "गुरव, नाह वी, परीट, कुंभार" इत्यादिक यांणीं सम पदी नंतरही पुनर्विवाह इच्छा असेल तर क रावा, त्यांस हितकारी आहे, यास प्रमाण.

ज्योतिर्निबंधे.

शूद्रांत्यजे पुनर्विहितं पुनर्भूवरणं हितं॥

अर्थ:- शूद्र व अत्यंज म्हणजे संकीर्ण जातिं यांस पुनर्विवाह विहित असून हितकारी आहे म्हणजे धर्म आहे.

यांतील निर्गलितार्थ. असा कीं.

सप्तपदीच्ये पूर्वीं पुनर्विवाह जाहल्यास तो निर्दोष असून चालू होता, स प्तपदीनंतरही शूद्र व संकीर्ण जातींनीं केल्यास निर्दोष असून चालू होता. सप्तपदीनंतर ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्यानीं ही करावा अशी आज्ञा होती; प रंतु तो आचरल्याचा पुराणांतरीं कोठें आढळत नाहीं.

आता विद्यासागर व विष्णु पंडित आप ले ग्रंथांत अर्जुनाचा व उलूपीनामक वि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धवा नागकन्येचा पुनर्विवाह जाहला असें लिहितात; परंतु तो पुत्रार्थ नियोग होय. रत्यर्थ पुनर्विवाह नव्हे. याचा सविस्तर विचार विठोबा अंणा दप्तरदार यांचे विवाहसंबंध ग्रंथांत पहावा. म्हणजे खात्री होईल पूर्व त्यातील एक युक्ति लिहितो अशीकी.

॥महाभारते आदिपर्वणी ॥

इत्येन एकादशपांडवानां पुत्रास्तेपां वंशधरोभिमन्युरिति ॥

अर्थ:- पाच पांवडा पासून द्रौपदीस जाहलेले पाच व प्रत्येक स्व स्त्रीचे ठाई जाहलेले पांच व हिडिंबाराक्षसी भीमसेनानें गांधर्व विवाहानें वरिली आणि तिचे ठाई उत्पन्न केलेला घटोत्कच एक असे अकरा पुत्र वंशवृधि करणारे असोन एक अर्जुनाचा मात्र पुत्र अभिमन्यु वंश प्रतिष्ठेस कारण जाहला॥ यात जर इरावान्। अर्जुनाचा पुत्र पांडवाचे वंशवृध्दिस लागू पडण्या जोगा असता तर तो ही बारावा गणिला असता तर तो नियोग धर्माचा क्षेत्रज पुत्र श्रुतसेन नागाचे वंशास लागू पडणार म्हणोन गणना केली नाहीं. जसी चित्रांगदेशी विवाह करुन उत्पन्न केलेला बभ्रुवाहन अर्जुनाचा पुत्र असोन तो पुत्रिका पुत्र असलेस्तव त्याची गणना केली नाहीं तद्वत्॥ ॥पुत्रिकापुत्र म्हणजे॥ ज्यास एक कन्याच जाहली पुत्र जाहला नाहीं त्याणे त्या कन्येचें दान समयी या कन्येस जो पुत्र होईल तो माझे वंशास लागू असा भाषा बंध करुन वरास कन्या द्यावी नंतर तिजला जो पुत्र होईल तो आपले वंशास ला-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गू करावा ॥ ॥ तो पुत्रिकाधर्म चित्रांगदेचे पित्यानें करून अर्जुना-
स कन्या दिली होती हा इतिहास भारतात आहे ॥ ॥ तस्मात
अर्जुनाचा व उलूपीचा विवाह नव्हे.

असें हें युगानुरूप धर्माचें प्रकरण समाप्त जाहलें.

आतां, द्वापारयुगाचे शेवट पर्यंतचा
रूधर्म होतेते. १ पातिव्रत्य २ नियोग
३ सहगमन ४ वैधव्य पालन ५, सप्त
पदीचे पूर्वी पुनर्विवाह ६ वी सप्तपदी
नंतर पुनर्विवाहाची परवानगी या पै
कीं कलियुगांत रद्द जाहले ते धर्म लिहितों.

१ कलियुगांत नियोग करूं नये.

संस्कार रत्नाकरे वायवीय
संहिता.

मृते जीवति वा पत्यौ न सुतं देवरादितः ॥

अर्थ:- कलियुगामध्यें पति जिवंत असो किंवा मरण पावो पुत्र
करितां दीर वगैरे यांशीं संग करूं नये.

२ विवाहित स्त्रीशीं पुनर्विवाह दोष पत्त
करून करणें तर कराया, अशी जी आ
ज्ञा होती तीही कलियुगांत रद्द समजावी.
यासप्रमाणें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

शास्त्रप्रदीप॥१॥निबंधशिरोमणि॥२॥धर्मप्रवृत्ति॥३॥संस्काररत्नाकर॥४॥या ग्रंथांत बाभ्रव्यस्मृतिः॥ वरे देशांतरं गते त्रीनृतून् संप्रतीक्ष्य वै॥ कन्यान्यस्मै प्रदातव्या वाग्दाने तु कृते सति॥१॥ पंचत्वं चेद् द्वरो गच्छेद्वाग्दानेय दिवे कृते॥ कन्यान्यस्मै प्रदातव्यातथा सप्तपदात्परं॥२॥ कृते सप्तपदे भर्तुर्वियोगो यदि जायते॥ न देया पुनरन्यस्मै कलौ कन्या मनीषिभिः॥३॥

अर्थ- विवाहाचे अगोदर एक वर्ष वाग्दान करावें अशी प्राचीन चाल होती, तेव्हां वाग्दान जाहलें, आणि नवरा परागंदा जाहला. किंवा मरण पावला, तरती कन्या दुसऱ्या वरास द्यावी. तसेंच सदर दोनी निमित्तांस सप्तपदी नंतरही कन्या दुसऱ्यास द्यावी. कलियुगांत मात्र सप्तपदी जाहल्या नंतर नष्ट किंवा मृत हीं उभय निमित्तें जरी उपस्थित जाहलीं तथापि ब्राम्हण क्षत्रिय वैश्य, या त्रिवर्गानीं कन्येचा पुनर्विवाह करूं नये. शूद्रादिकानीं केल्यास चिंता नाहीं.

५ संस्काररत्नाकरे वायवीयसंहिता॥ मृते जीवति वा पत्यौ न सुतं देवरादितः॥ क्रांतसप्तपदां कन्यां नोद्वहेच्च कलौ द्विजः॥१॥

अर्थ- कलियुगांत नियोग करूं नये तसेंच नवरा जीवंत असो अगर मरो सप्तपदी जालेले स्त्रीशीं ब्राम्हण क्षत्रिय वैश्य यांणी पुनर्विवाह करून घेऊं नये.

६ प्रायश्चित्तहेमाद्रौ देवलस्मृतिः॥ दत्ताक्षता

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याः कन्यायाः पुनर्दानं परस्यच ॥ दीर्घकालं ब्रम्हचर्यं वर्जयीत कलौ युगे ॥ १ ॥

अर्थ- विवाह होऊन पति संग जाहला नाहीं, अशा स्त्रीचा पुनर्विवाह व पुरुषानें यावज्जीव दंडाजिन मेखलादि सहित ब्रम्हचर्य कलियुगांत करूं नये.

७ आदिपुराणे ॥ उढायाः पुनरुद्वाहं ज्येष्ठांशं गोवधं तथा ॥ कलौ पंच न कुर्वीत भ्रातृजायां कमंडलुं ॥ १ ॥

अर्थ- एकवेळ सप्तपदीस विवाह जाहलेले स्त्रीचा पुनर्विवाह व वांटणी समयीं ज्येष्ठांश व गवालंभ व नियोग व सजल कमंडलु धारण हे धर्म कलियुगांत करूं नयेत.

८ ब्रम्हपुराणे ॥ स्त्रीणां पुनर्विवाहश्च देवरात्पुत्रसंततिः ॥ स्वातंत्र्यंवा कलियुगे न कर्तव्यं कदाचन ॥ १ ॥

अर्थ- विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह व नियोग व स्त्रियांस स्वातंत्र्य हें कलियुगांत वर्ज्य आहे.

९ वृहन्नारदीय पुराणे ॥ कलिवर्ज्य प्रकरणे ॥ दत्तायाश्चैव कन्यायाः पुनर्दानं परस्यच ॥

अर्थ- एकवेळ दिलेली कन्या पुनः दुसऱ्या वरास कलियुगांत देऊं नये.

१० क्रतुपुराणे ॥ कलिवर्ज्य प्रकरणे ॥ देवरेण सुतोत्पत्तिर्दत्ता कन्या न दीयते ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अर्थ:- कलियुगांत, नियोग, व स्त्रियांचा पुनर्विवाह करूं नये.

११ स्कंदपुराणे कलिवर्ज्य प्रकरणे ॥ दत्तायाश्चैव
कन्यायाः पुनर्वैवाहिको विधिः ॥

अर्थ:- कलियुगांत दिलेले कन्येचा पुनर्विवाह करूं नये.

१२ गरुडपुराणे ॥ कलौ न क्रियते ऽश्वमेधो
वाप्यथ गामखः ॥ नरमेधो क्षतानारी देवरा
त्पुत्रसंततिः ॥ गर्हितं सप्तकं ह्येतद्राजसूयक
मंडलू ॥ १ ॥

अर्थ:- अश्वमेध, गवालंभ, नरमेध, विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह,
नियोग, राजसूय व सजल कमंडलु धारण हे कलीं मध्यें करूं नये.

१३ निगमे ॥ अक्षता गोपशुश्चैव श्राद्धे मांसं तथा
मधु ॥ तथैव पौरुषं मेधं कलौ पंच विवर्जयेत् ॥ १ ॥

अर्थ:- विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह, गवालंभ, मांस व मधु श्राद्धांत
वाढणें, नरमेध हे कलीमध्यें करूं नये.

१४ रेणुका निबंधोदाहृतवचन ॥ ऊर्ध्वसंस्कारतो
यानि विवाहविषयाणि तै ॥ वाक्यान्यक्षतयोन्या
स्कृतानि स्फः कलिमंतरा ॥ १ ॥

अर्थ:- एकवेळ विवाह होऊन गेल्या नंतर पुरुषसंग न जाहलेले स्त्रीचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पुनर्विवाह करावा, अशीं जीं काय वचनें असतील तीं सर्व कलींत रद्द समजावीत.

१५ निर्णयसिंधौ धर्मज्ञसमयेकलिवर्ज्ये॥ विधवायाःसुतोत्पत्तौ देवरस्य नियोजनं॥ बालायाः क्षतयोन्याश्चवरेणान्येनसंस्कृतिः॥

अर्थ- हें वचन निर्णय सिंधूंत आदित्यपुराणातील असें म्हटलें आहे परंतु त्या आदित्य पुराण भागासच धर्मज्ञ समय असें नाव आहे॥ कलियुगात मेल्या नवऱ्याचे स्त्रीस पुत्र उत्पन्न करून देण्याची आज्ञा दिराला देण्याची आज्ञा लिंग दिरास करू नये॥ अणखी तसेंच मेल्या नवऱ्याची स्त्री बाला म्हणजे पति संग न जाहलेली किंवा क्षत योनि म्हणजे पति संग जाहलेली असो तीचा दुसऱ्या नवऱ्याशी पुनः विवाह संस्कार करू नये॥ म्हणजे युगांतरी दोष पत्त करून पुनर्विवाह करणे असल्यास करावा अशी जी आज्ञा होती ती कलियुगात रद्द समजावी॥ ॥ या श्लोकाचे उत्तरार्धात। बाला व क्षत योनी या दोन विशेषणास विशेष्य पाहिजे ते का पूर्वार्धातील विधवापद घ्यावे किंवा निराळेच अध्याहारानें स्त्री पद घ्यावे अशी आशंका जाहल्यास केवळ अध्याहृत स्त्रीपद घेण्यापेक्षा एक श्लोकस्थ संनिहित विधवा पद घेणे समंजस आहे॥ यास उदाहरण॥ जसे॥ ब्राम्हणास दही वाढावे आणि कौंडिन्य गोत्र्यास ताक वाढावे या वचनात कौंडिन्य गोत्री घेणे तो ब्राम्हणच सर्व शास्त्री लोक घेतात कौंडिन्य गोत्री क्षत्रिय किंवा वैश्य घेत नाहींत, तसेच, सैनिकास पागोटी द्यावी आणि तरवार बाहद्दरास कडी द्यावी अशी राजाज्ञा जाहल्यास कामगार सैनिक तरवार बाहद्दरासच कडी देतात प्रांतांत जे तरवार बाहद्दर असतील त्यास देत नाहींत त्या प्रमाणे येथेही विधवा हे पद विशेष्य घेणे समंजस आहे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

१६ ब्रम्हवैवर्त पुराणे ॥ कलौनान्या गतिः स्त्रीणां सहानुगमनादृते

अर्थ — याचा अर्थ निर्णय सिंधूंत केला आहे तो. यावज्जीव क्लेश देणारें ब्रम्हचर्य करण्यास जी स्त्री अशक्त आहे, तिजला कलियुगांत सहगमना वांचून दुसरी गति नाहीं.

सदर लिहिलेल्या किती एक वचनांत, कलीमध्यें स्त्रियांचा पुनर्विवाह करूं नयें असें जरी मोघम आहे, किती एक वचनांत विवाह होऊन पति संग जाहला नाहीं अशांचा पुनर्विवाह कलीमध्यें करूं नये, व पतिसंग जाहलेल्यांचाही पुनर्विवाह करूं नये; व सप्तपदी जाहल्या नंतर पति मरो, अगर जीवंत असून परागंदा वगैरे होवो. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, या जातींचे स्त्रीचा पुनर्विवाह कलियुगांत होणें नाहीं असा विशेष आहे, तथापि ॥अनुक्तमन्यतो ग्राह्यं॥ असी शास्त्रकाराची आज्ञा आहे म्हणजे जीं मोघम वचनें असतील त्यांत तत्सजातीय इतर वचनांत जे विशेष असतील ते सर्व घ्यावेत. यांस उपसंहार न्याय असें मीमांसक म्हणतात, यास लौकिक उदाहरण॥ घरचे पांच बंधु पैकी एकानें चाकरास सांगितलें भाजी आण। दुसऱ्यानें सांगितलें चांगी आण, तिसऱ्यानें सांगितलें काळी आण, चवथ्यानें सांगितलें, जून आणूं नको, पांचव्यानें सांगितलें शिळी आणूं नको, यात भाजी आणरानें सर्व समुच्चय करून ताजी कोवळी काळी चांगल्याची भाजी आणली पाहिजेत तसे पुनर्विवाह निषेध प्रकरणस्थ सर्व वाक्यांची एक वाक्यता म्हणजे एकंदर बेरीज करितां निष्पन्न जाहला तो अर्थ.

कलियुगामध्यें ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य जातीचे स्त्रियांस सप्तपद्यंत विवाह जाहल्या नंतर पति

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मरो अगर जीवंत असून परागंदा झाला. किंवा संन्यासी, किंवा नपुंसक, किंवा बाटला, किंवा सगोत्र किंवा सप्रवर, किंवा महारोगी, किंवा जन्मठेप जाहलेला असो, पुनर्विवाह दुसऱ्या नवऱ्याशीं होणार नाहीं. शूद्र व संकीर्ण जातीच्या स्त्रियानीं मात्र पाहिजेल तर करावा.

कलियुगामध्यें वाग्दानोत्तर सप्तपदीचे पूर्वी जो पुनर्विवाह व्हावयाचा तो अंधबधिरादि अल्पापत्तीस होणे नाहीं मरणादि महापत्तीसच व्हावयाचा सप्तपद्युत्तर तोही सर्वथा होणे नाहीं असें गद्य हारीत म्हणतात ती स्मृति गोविंदार्णव ग्रंथात लिहिली आहे ती अशी.

आसनाभिवादनो त्थानातिथ्यादिधर्मसाधनानि साधूनामेतेषां प्रदाने पि कन्याया व्यतिक्रमो विद्यते न्यत्रयाथातथ्यात् क्लीब पतित प्रोषित प्रव्रजित प्रमीतेष्वतुमीमांसते ॥ नोदकेन न वाचा वेति प्रजापतिरतस्तां चेत्प्रतिगृण्हीततस्मै दद्यादित्येके मन्यंते ॥ तन्नाकृत्स्नविधानात् पाणिग्रहणमंत्रैरित्यपरे तत्रापि सख्याभावान्न पाणिग्रहणमंत्रे जार्या जानीयात् कृत्स्नं हि सप्तमे पदे जायापतित्वं नतदूर्ध्वं व्यतिक्रमणमिति ॥

अर्थ:- कन्या मागण्यास आले त्यावर पक्षी यास येतांच अभ्युत्थान घेतले व नमस्कार केला व आसन दिले व सारवर पाणी इत्यादि आतिथ्य केले, ही धर्माची अंगे जाहली इतक्यानेच महाजे कन्या खचित जाहली असें नाहीं तर कारण परले फिरेल

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आतायाथातथ्य म्हणजे, अमुकाचे मुलास तुमची कन्या द्यावी असे वरपक्षीय जसें बोलले तसें वधूचे पित्यानें प्रदास्यामि म्हणजे देईन असें वाचेनें त्रिवार कबूल करणें, एतद्दुःसत्यं, हेतुमचे आमचे स्वचित ठरले असें वाग्दान जाहल्या नंतर मात्र कोणतीही अंधबधिरादि अल्पापत्ति येवो कलियुगांत कन्या फिरावयाची नाहीं. वर नपुंसक किंवा बाटला, किंवा उठोन गेला, किंवा सन्यासी जाहला, किंवा मेला, इत्यादि महा पत्ती अल्यास मात्र विचार आहे, कोणी म्हणतात, केवळ वाग्दानानें किंवा उदक पूर्वक कंन्या दानानें कन्या वराची स्त्री जाहली असें नाहीं, तर वरानें समंत्रक प्रतिग्रह केला तर मात्र त्याची जाहली. ती फिरावयाची नाहीं. दुसरे कोणी म्हणतात की, प्रतिग्रह केला तरी फिरेल परंतु समंत्रक पाणिग्रहण केले, तर मात्र फिरावयाची नाहीं. हारीत स्मृत सांगतात की, समंत्रक पाणि ग्रहण जाहले तरी कन्या फिरेल परंतु सप्तपदी होऊन सख्य जाहले म्हणजे मात्र फिरावयाची नाहीं, ज्यास दिली त्यास दिलीच तो मरो अगर असोन नपुंसकत्वादि दोष युक्त असो सप्तपद्युत्तर कली युगांत पुनर्विवाह होणे नाहीं.

कलियुगांत जर विधवेशी विवाह, गैर समजून जाहला, आणि पुढें समजलें तर तीचा त्याग करून प्रायश्चित घ्यावें, असें आश्वलायन सांगतात.

तें असें कीं.

अज्ञानतो द्विजो यस्तु विधवा मुद्वहेद्यदि ॥ परित्यज्य विदित्वैनां प्रायश्चित्तं समाचरेत् ॥ १ ॥ अद्भुमेकं विधायादा चक्रीणिव्रतं चरेत् ॥ पुत्रश्चेज्जा

यतेतस्यां कुंड गोलक उच्यते ॥ २ ॥ विधवोद्वापतिश्चै
व कुंड गोलक इत्यथ॥ त्रयश्चैव हि निंद्याः स्युः सर्व
धर्म बहिष्कृताः ॥ ३ ॥ संस्कार्यो वितियत्प्रोक्तं मुनि
भिः कुंड गोलकौ ॥ युगांतरे स धर्मः स्यात्कलौ नि
द्य इति स्मृतः ॥ ४ ॥

अर्थ- ब्राम्हण, क्षत्रिय, व वैश्य याणीं अज्ञानानें जर विधवेशीं विवाह केला, तरी कळल्यावर त्या स्त्रीचा त्याग करून प्रायश्चित्त घ्यावें, तें असें कीं, पूर्वी एक म्हणजे मुख्य पक्षानें अब्द प्रायश्चित्त करून शेवटीं अवकीर्णि व्रत म्हणजे गर्दभ पशु याग चवाठ्यावर म्हणजे "सर्व लोकांचे वागणुकीचे रस्त्यावर" करावा. अब्द प्रायश्चित्त म्हणजे तीन दिवस एक वेळ दिवसा भोजन करावें. व तीन दिवस नक्त करावें. व तीन दिवस कोणी दिल्यास भोजन करावें. व तीन दिवस निराळस उपोषण करावें. असें बारा दिवस केलें म्हणजे एक कृछ्र होतें. अशीं एक सारखीं वर्ष पर्यंत कृछ्रें केलीं म्हणजे एक अब्द होतें. आतां कृछ्र स्थानीं गोप्रदान करावें. असा जो प्रत्याम्नाय पक्ष आहे तो येथें ग्राह्य नाहीं. कारण कृछ्रं, या एक वचनानें एक कृछ्र असा अर्थ होत असोन पुनः एक ग्रहण केले ते मुख्यार्थक म्हटले तरच सार्थक होते, यास्तव प्रत्याम्नाय घेता येत नाहीं. कळण्या पूर्वी जर संतति जाहली असेल तर तीस कुंड गोलकत्व येईल. आणि पुनर्विवाह केलेली विधवा व तिचा पति व तिची संतति हे निंद्य व वर्णबाह्य होतील. कुंड गोलक पुत्र व कुंड गोलक कन्या यांस संस्कार करावा असें शास्त्र आहे; परंतु तें युगांतरीं चालू होतें कलियुगांत रद्द आहे.

जेव्हा अज्ञानाने विधवेशि विवाह होऊन संतती

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जाहल्यासहीदशा, तेव्हांबुध्दिपूर्वक विधवेशी विवाह केल्यास नष्टोपशुध्यर्थ प्रायश्चित्तच नाहीं, असें म्हणण्यास भीड नको.

तेंच प्रायश्चित्त हेमाद्रितदेवलसांगतात.

समुद्रयातुः स्वीकारः कमंडलुविधारणं॥ दत्ताक्षतायाः कन्यायाः पुनर्दानं परस्यच॥१॥ दीर्घकालं ब्रम्हचर्यं वर्जयीतकलौयुगे॥ एतान्यस्तु त्यजेद्दुर्मान्सद्विजोदोषभाक् भवेत्॥ तस्यवैनिष्कृतिर्नीस्तितप्तकृछ्रशतैरपि

अर्थः- जाहजांतून समुद्रांतील धंदा करणें किंवा जाहाजातून म्लेंच्छ देशास जाणें व सजल कमंडलु नेहमी बाळगणें व विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह करणें व यावज्जीव दंडाजिन मेखलादि सहित ब्रम्हचारि राहणें हे धर्म कलियुगांत रद्द आहेत. हें नमानितां अंगजोरानें जो आचरील त्यास दोष लागेल. तो दोष घालवूं म्हणेल तर शेकडों तप्तकृछ्रें केली तरीं जाणार नाहीं. तप्तकृछ्र म्हणजे, तीन दिवस बारा पैसें भार तप्त जल प्राशन करावें. तीन दिवस तप्त दुग्ध आठ पैसे भार प्राशन करावें. तीन दिवस चार पैसे भार तप्त तूप घ्यावें. तीन दिवस उष्णोदकाची वाफ पोटांत घ्यावी. असें बारा दिवसांचें एक तप्तकृछ्र होतें.

या श्लोकातमेला गेलाहूत्या दिनिमित्तावे शहून सता, तो अर्थ कशावरुन लिहिला असें कोणी म्ह

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णातील तर उपसंहार न्यायानें लिहिला असें समजावें. उपसंहार न्याय म्हणजे एका प्रकरणीं जितकीं सामान्य व विशेष वचनें, ऋषींचीं असतील तितक्या सर्वांतील विषयाची एकंदर बेरीज करून जो अर्थ सिद्ध होतो त्यास उपसंहार असें मीमांसक म्हणतात. हा विषय मागें लिहिला आहे.

येणे प्रमाणें युगांतरचे साहा धर्मांपैकीं नियोग व सप्तपदीचे पूर्वील पुनर्विवाहाची अल्यापती व सप्तपद्युत्तर पुनर्विवाहाची परवानगी ब्राम्हण क्षत्रिय वैश्यास रद्द होऊन कलियुगांत राहिलें प्रकार असे कीं.

१ पातिव्रत्य . . . .
२ सहगमन . . . .
३ वैधव्यपालन . . . .
४ सप्तपद्युत्तर शूद्रादिकानीं पति मरणादि महापत्ति आल्यास स्त्रियांचा पुनर्विवाह पाहिजे तर करावा . . . .
५ वाग्दानोत्तर सप्तपदीचे पूर्वी सर्व वर्णानी पति मरणादि महापत्ति अल्यास प्रायश्चित्त पूर्वक स्त्रियांचा पुनर्विवाह करावा.

यद्यपि सप्तपदीचे पूर्वील पुनर्विवाह युगांतरीं ऐच्छिक होता असें पूर्वी सांगितलें त्याविषयीं कलीमध्यें निषेध सांगितला नसल्यास्तव कलिमध्यें ऐच्छिक होवूं लागेल असें प्राप्त जाहलें तथापि तो कलिमध्यें ऐच्छिक नाहीं तर केलाच पाहिजे हे पुढें लवकरच सांगण्यांत येईल.

यातील सारांश.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कलियुगामध्यें वाग्दानोत्तर सप्तपदीचे पूर्वी पतिमरणादिमहापत्तिनिमित्तक पुनर्विवाह सर्ववर्णांनि प्रायश्चित्तपूर्वक केलाच पाहिजे तो निर्दोष आहे. सप्तपद्युत्तर ही शूद्रादिकानी पतिमरणादिमहापत्तिनिमित्तक पुनर्विवाह पाहिजे असल्यास करावा. ब्राम्हण क्षत्रियवैश्य यानी करूनये. याप्रमाणें कलियुगांत जितके निबंध ग्रंथ जाहले तितक्यास मान्य असोन रूढींतही आहे.

आताकितिएक बंगालीव महाराष्ट्र ब्राम्हण लोक कलियुगांत, ब्राम्हण जातीचे सप्तपर्यंत विवाह जाहलेले स्त्रीचा पुनर्विवाह शास्त्र संमत आहे, असाकी कलियुगचे धर्म सांगणाऱ्या लघु पराशरस्मृतीत

नष्टेमृते प्रव्रजितेक्लीबेच पतितेपतौ॥ पंचस्वापत्सु नारीणांपतिरन्यो विधियते॥

असें वचन आहे, त्याचा अर्थ विवाहितस्त्रीचा पति मरणादि पाच आपत्ति आल्यास पुनर्विवाह करावा, असा आहे. आणि कलौपाराशराःस्मृताः म्हणजे कलियुगात पराशरानी सांगितलेले धर्म आचरावे असें पराशरच म्हणतात. तेव्हा नष्टेमृते हे वचन सर्व वचनाचे बाधक होय, याकरितां सदर विवाह शास्त्र संमत आहे, परंतु रूढीत मात्र नाहीं, तो रूढीत अणणे विषयीं झटतात.

**यावर आमचे
म्हणणे.**

जी लघुपराशर स्मृति बारा अध्याय आहे, ती प्राधान्ये करून क-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लियुगचे धर्म सांगत असोन युगांतरचे ही कांहीं धर्म सांगते असे तीचे व्याख्याकार माधवाचार्य याचे म्हणे. आणि फक्त कलियुगचेच धर्म सांगते, असे नंद पंडित व भट्टोजी दीक्षित याचे म्हणे ॥ असो ॥ सदर स्मृतीत प्रायश्चित्त प्रकरणी जे नष्टे मृते हे वाक्य आहे, त्याचा अर्थ पाहिला तर, पतिमरणादि आपत्ति आल्यास स्त्रियानी दुसरा पति करावा. इतकाच शब्दार्थ आहे. यात विवाह बोधक स्पष्ट पद नाहीं. तेव्हा नारद संहितेतील वचना प्रमाणें नियोग पर या वचनाचा अर्थ का करूनये. कोणी म्हणतील की लग्न संबंधा वाचुन पति शब्दाचा प्रयोग कसा घडेल तर ती अडचण नाहीं, कारण लग्न न होता मैथुन करणारासही पतिशब्द दिला आहे, उदाहरण बृहत्पराशरे, प्राह सत्यवती पतिः ॥ येथें सत्यवतीचा व पराशर ऋषीचा विवाह जाहला नसून केवळ एक वार संग मात्र जाहला, इतक्यानेंच त्यास तिचा पति असें म्हंटले आहे. उदाहरण दुसरे, कोशात वेश्यापतिर्भुजंगः स्यात्। वेश्येचा जो पति त्यास भुजंग असें म्हणावे, येथेंही लग्न नसता पति शब्द दिला आहे. उदाहरण तिसरे, नारद संहितेत. स्वस्त्रीचे समागमी ज्यास पुरुषत्व नसून परस्त्री समागमी पुरुषत्व येते, त्या नपुंसकास अन्यापति असें नारदानी म्हटले आहे, येथेही विवाह नसता पति शब्द दिला आहे. उदाहरण चवथे, देवल स्मृतीत। मृते जीवति वापत्यौ स्त्री विरोहूवरं पतिं ॥ अर्थ भर्ता मेला किंवा जीवंत असोन प्रजोत्पादनाचे उपयोगी नसेल तर पुत्राकरिता दीर पति करावा म्हणजे मैथुन कर्ता करावा. आणि नियोग पर अर्थ करण्यास पराशराची संमतीही मिळते, अशी की त्याणी या वचनाचे मागे जवळच ॥ औरसः क्षेत्रजश्चैवदत्तः कृत्रिमकः सुतः ॥ असा क्षेत्रज पुत्र सांगितला आहे ॥ तो क्षेत्रज पुत्र नियोगावाचून कसा घडेल, तस्मात् हा नियोगच म्हटला पाहिजे ॥ अता यावर उत्तर

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इतकेंच की, कलियुगांत नियोग वर्ज्य आहे यास्तव तसा अर्थ करिता येत नाहीं. ठीक आहे. नियोगाचा निषेध पराशरानी केला आहे किंवा इतर ऋषिनी केला आहे. पराशरस्मृतींत नसल्यामुळें इतर ऋषीनी केलेला असेंच म्हणे भाग आहे. तेव्हा जसा इतर ऋषिनीं कलियुगांत नियोग वर्ज्य केल्यामुळें नष्टेमृते या वचनाचा, नियोगपर अर्थ करिता येत नाहीं. तसा इतर ऋषिनी कलियुगात सप्तपदी जाहलेले स्त्रियांचा पुनर्विवाह वर्ज केला आहे तेव्हा सप्तपर्यंत विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह करावा असाही अर्थ करु नये ॥ कारण निषेधाश्च बलीयांसः॥ म्हणजे निषेध शास्त्र बलवत्तर असते, तेव्हा ते मानिलेच पाहिजे असा शास्त्राचा नेम आहे.

आता म्हणाल कीं, करावे अशी आज्ञा व न करावे अशी ही आज्ञा एकाच गोष्टीस असल्यास ती गोष्ट पाहिजे तर करावी, पाहिजे तर न करावी असा विकल्प होतो, असाही शास्त्राचा नेम आहे, यास उदाहरण. श्राद्धात, तुळशी द्याव्या असें वचन आहे, व देऊ नये असेंही वचन आहे, तेव्हा द्याव्या किंवा देऊ नये असा विकल्प होतो तसा येथे विकल्प होईल म्हणाल तर तो नियोगपर अर्थासही लागू पडेल, व, विकल्प मानणे अगतिक गती आहे, कारण त्यास आठ दोष येतात, ते मीमांसकास संमत नाहींत. व, येथे विकल्प करण्यांत उपयोगही नाहीं, कारण नियोग व पुनर्विवाह हे मुळचेच वैकल्पिक आहेत, त्यास पुनः वैकल्पिक म्हणे निष्प्रयोजन आहे. आणखी जर नष्टे मृते या पराशर वचनाचा अर्थ विधवादिकाचा पुनर्विवाह करावा असा असता तर धर्मतत्वज्ञ ऋषिनी कलियुगांत न करणेचें कर्मांचा ठराव केला त्यात विधवेच्या पुनर्विवाहाचा निषेध केला नसता ॥ कारण पराशर स्मृती ते वेळेस होती, कशावरुन म्हणाल तर ॥ पराशर स्मृतीचे आरंभी वचन आहे ते असे.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व्यासमेकाग्रमासीनमपृच्छन्नृषयः पुरा॥ मानवानां हितं धर्मं वर्तमाने कलौ युगे॥ शौचाचारं यथावच्च वद सत्यवती सुत॥

अर्थ:- हे व्यास महाराज कलियुग लागले असता हितकारक धर्म कोणते ते सांगा, असा पूर्वी ऋषिनी व्यासास प्रश्न केला, नंतर सर्व पराशराकडे गेल्यावर त्याणी, ही, स्मृती सांगितली. याल ऋषिनी पूर्वी प्रश्न केला असें म्हटले यावरून कलीचे पूर्वीच ही स्मृती जाहली हे सिद्ध आहे, तेव्हा त्या स्मृतीचे अध्ययन करणारे व सांप्रदायिक अर्थ जाणणारे विद्वान लोक होते॥ जर त्या स्मृतीत तुम्ही म्हणता असा अर्थ असता तर, कलि मध्यें पराशराचे धर्म आचरावयाचे असोन विधवेच्या विवाहाचा निषेध जाहला नसता, व, आश्वलायन आणि देवल हे कलियुगांत विधवा विवाह केल्यास घोर प्रायश्चित न सांगते. व, विधवा दिकाचा पुनर्विवाह कलियुगांत पराशरास संमत असता तर ते आपले पुराणात विधवा विवाह जाहल्यास त्या उभयता स्त्री पुरुषाचे अंन जेऊ नये असा निषेध न सांगते. यावरून नष्टेमृते या पराशर वचनाचा अर्थ तुम्ही म्हणता असा नव्हे यात संशय नाहीं.

तेव्हा पद्म पुराणा प्रमाणें सप्तपदीचे पूर्वी वरमरणादि महापती निमित्तक कन्येचा पुनर्विवाह करावा. असाच अर्थ पराशर वचनाचा करणे समंजस आहे. आता कोणी म्हणतील कीं, युगांतरी हा प्रकार होता, तो कलियुगांत निषिद्ध नसल्यास्तव सिद्धच आहे, मग पराशरास सांगण्याचें कारण काय? याचें उत्तर, स्नान संध्या जप होम इत्यादि कर्मे युगांतरीची सिद्ध असता ती पुनः पराशर कां सांगतात, तर तो अनुवाद म्हणावा. तसा हाही अनुवाद म्हणण्यास अडचण कोणती. अनुवाद म्हणजे, जो विषय एक वेळ कोठें तरी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सांगीतला. तोच पुन: सांगणे याचें नाव अनुवाद. वस्तुत: केवळ हा अनुवादच नव्हे, तर याचे प्रयोजनही संभवते. असेंकीं, युगांतरी सप्तपदीचे पूर्वील विवाहास, पाहिजे तर करावा असें ऐच्छिक होतें तसें कलीयुगामध्यें ऐच्छिक नसोवेंतर अवश्य केलाच पाहिजे हें सांगणे करितां या वचनाची प्रवृत्ती आहे, म्हणूनच या वचनाचा पाठ प्रायश्चित्त प्रकरणात केला आहे, तेणे करून या पुनर्विवाहास प्रायश्चित्त अलेस्तव अवश्य केलाच पाहिजे, कारण जें प्रायश्चित्त तें करावेंच लागतें, असें मनु म्हणतात.

चरितव्यमतो नित्यं प्रायश्चित्तं विशुध्दये॥

यावरून सदर पराशर वचन सप्तपद्यंत विवाहित स्त्रीचे पुनर्विवाहास बिलकुल साधक नाहीं, हें स्वचित आहे.

अतां पराशरानीं क्षेत्रज पुत्र सांगीतला याची वाट काय म्हणाल तर क्षेत्रज व कृत्रिम हे दोन पुत्र युगांतर विषयक, कारण

दत्तौरसेतरेषां तु पुत्रत्वेन परिग्रहः॥

म्हणजे, दत्तक व औरस हेच दोन पुत्र कलियुगांत ग्राह्य इतर पुत्र ग्राह्य नाहींत असें धर्मज्ञाचे ठरावांत आहे, असी माधवानी व्यवस्था केली आहे. नंदपंडितानी जी व्यवस्था केली की क्षेत्रज हे औरसाचे विशेषण म्हणजे औरस कसा असावा, तर स्वस्त्रीचे ठाई उत्पन्न जालेला असावा इत्यादि परंतु ती क्लिष्ट व सरस नाहीं याचा विस्तार विवाहतत्वात पहावा.

अणस्त्री पुनर्विवाहोत्तेजक मंडळीआप

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णास श्रुती ही साधक आहे म्हणोन तैत्तिरीयब्राम्हणांत गेज श्रुती दाखवितात ती ॥

उदीर्ष्वनार्यभिजीवलोकमितासुमेतमुपशेषएहि॥ हस्तग्राभस्यदिधिषोस्त्वमेतत्पत्युर्जनित्वमभिसंबभूव॥ यावरील सायणाचार्यांचे भाष्य ॥ हेनारि त्वं इतासुं गतप्राणं॥ एतं पतिं उपशेषे उपेत्य शयनं करोषि॥ उदीर्ष्व अस्मात्पतिसमीपादुत्तिष्ठ॥ जीवलोकमभि जीवंतं प्राणिसमूहमभिलक्ष्य॥ एहि आगछ त्वं हस्तग्राभस्य पाणिग्रहं कृतवतः॥ दिधिषोः पुनर्विवाहेछोः॥ पत्युः एतत् जनित्वं जायात्वं॥ अभिसंबभूव॥ आभिमुख्येन प्राप्नुहि॥

यावर उत्तर.

जरी ही श्रुती तुम्हास पुनर्विवाह साधक वाटली असेल तर, ती युगांतर विषयक होईल, कारण या श्रुतीत साक्षात् किंवा प्रकरण:वंशेकरून कलि संबंध नाहीं. तेव्हा जशा गवालंभादि श्रुती युगांतरीय विषयक, तशी ही हियुगांतर विषयक होईल. हे एक. असो, सदर भाष्याचा भावार्थ सांगतात तो असा की हे स्त्रिये, तूं या, गत प्राण पुरुषा पाशी शयन केलें आहेस, तूं यास जीव लोकाकडे पहा, आणि इकडे ये, पुनर्विवाह करूं इछिणारा व पाणि ग्रहण करणारा, अशा पतीचें संबंधाचें जें जायात्व त्या तें तूं प्राप्त हो. म्हणजे पुनर्विवाह करणाऱ्या पतीची भार्या खुशाल हो. हा भावार्थ पाहून आम्हास मोठा अचंबा वाटला, कारण हा भाष्याचा भावार्थ के-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

वरु गैर माहितीचा आहे. हा प्रसंग कोण याचा त्याणी बिलकुल वि-
चार केला नाहीं. तेव्हां जो,मंत्र भाष्याचा अर्थ समजले,त्याप्रमाणें
जो जो अग्निहोत्री किंवा, स्मार्ताग्निमान्, मरेल, त्याचे स्त्रीस त्याज
पाशी निजउन सदर मंत्रानें उठउन तिजला तूं दुसरा नवरा खु-
शाल करजा, अशी परवानगी देण्याचा नूतन विधि चालू करावाला-
गेल. कारण पुराणांतरी अमुकाचे स्त्रीस हा विधि करून दुसरा
नवरा करजा अशी आज्ञा जाहल्याचा आढळ नाहीं, व सांप्रत
कोठें रूढी ही नाहीं. व हल्लीचे निबंध ग्रंथांत कोठें लिहिलेलें नाहीं.
तेव्हा हा स्वकपोलकल्पित नवीनच विधि होणार, तसें करणें उचित
नव्हे. तस्मात् जो ऋषिनी विनियोग केला असेल तोच घेतला पाहि-
जे, तो या मंत्राचा आपस्तंबादिकानी विनीयोग असा केला आहेकीं,

अथास्य भार्यामुपसंवेशयंति। इयंनारीपति
लोकं वृणाना॰ तांपतिस्थः सव्ये पाणावभिपा
द्योत्थापयति। उदीर्ष्वेति॥

याचा अर्थ धूर्तस्वामि कपर्दिस्वामि, मातृदत्तप्रभृति भाष्यकारानी
लिहिला तो, असा,

इयंनारीतिमृतेन सहशाययित्वा। अपुत्रोमृते
श्चेत्। तां पतिस्थः मृतस्यभ्राता। मन्त्रेणैवमिच्छ
मानः। उत्थापयति। लप्स्यद्दं पुत्रमुत्पाद्यिष्येउ
त्तिष्ठेति॥ तस्येपुत्रं द्रविणंचधेहीतिमंत्र लिं
गात्॥ यद्येवंनानुत्तिष्ठति। एतन्मंत्रद्वयस्यलो
प इति॥ याचा भावार्थ॥

निपुत्रक मरण पावला आणि त्याचीस्त्री पुत्र नसल्या कारणानें
सहगमनाचा संकल्प करून निघाली तर तिचे सांत्वन तिचे दिरा-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णें करावें कीं, मी पतिस्थानीय आहे, तुजला नियोग धर्मानें पुत्र करून देवुन वंश चालवीन हें तिणें कबूल केल्यास, दुर्यंनारी या मंत्रानें मृतापाशीं निजऊन, उदीर्ष्व या मंत्रानें उठवून अणावी. हें ती कबूल न करील तर हा प्रकार करूं नये. याचा खुलासेवार आधार बृहद्धर्मविधानांत शौनकानीं लिहिला तो, असा,

भ्रातुर्भार्यामपुत्रस्य संतानार्थं मृते पतौ ॥ देवरोन्वारुरुक्षाणामुदीर्ष्वेति निवर्तयेत् ॥ ऋतुकाले तु संप्राप्ते घृताभ्यक्तोथ तामियात् ॥ एकमुत्पादयेत्तु नं न द्वितीयं कथंचन ॥ पुत्रमुत्पादयेद्देवं स्वभुवोह्यनुशासनं ॥ अन्वारोह फलं चापि लभेन्मंत्रप्रभावतः ॥

अर्थ- ज्या स्त्रीस पुत्र नसोन भर्ता मरण पावला, तेव्हां ती पुत्र नाहीं त्यापेक्षां मागें राहून तरी काय उपयोग, अशी उदासीन होऊन अन्वारुरुक्षा म्हणजे सहगमनाचा समंत्रक संकल्प करून निघाली. तो संकल्प याचा मंत्र श्राद्धगोविंदाणवांत लिहिला आहे तो असा.

देवैः संकल्पितोमह्यं पतिस्त्वं सर्वदेवतः ॥ त्वया सह गमिष्यामि पतिर्मे चाग्र जन्मनि ॥

अर्थ- हे स्वामिन्, तुम्ही मजला देवानीं, सर्व देवतारूप पति करून दिले आहे. तस्मात् तुमचे बरोबर सहगमन करते. तुम्हीच माझे पुढील जन्मीं पति व्हावे. असा संकल्प करून निघाली जी, तिचे दिरानें तिचें सांत्वन करावें कीं, पुत्र नसल्या कारणानेंच सहगमन करतील तर करूं नको मी पतिस्थानी आहे त्यापेक्षा नियोग धर्मानें तुजला पुत्र करून देऊन तुझा वंश चालवीन. हे तिणे मान्य के-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

त्यास, इयंनारी या मंत्रानें तिजला मृत पतिसंनिध चितेवर निजऊन, उदीर्ष्व नारी या मंत्रानें उठऊन अणावी. आणि नियोग धर्मानें पुत्र उत्पन्न करून घ्यावा. असा पुत्र करून देणे विषयीं ब्रम्हदेवाची आज्ञा आहे. आणि हास मंत्रक विधि केल्यानें मंत्र सामर्थ्यास्तव, पुढील जन्मी हाच पति व्हावा, असें जे सहगमनाचें फल तेही प्राप्त होते. आता जी स्त्री पुत्र असताही, पातिव्रत्य धर्मास्तवच सदर प्रमाणें संकल्प करून निघाली परंतु पहिले धैर्य सुटोन भयभीत जाहली तर तिजला सदर प्रकार करून परत अणावी असें शाकल स्मृतीत आहे. ते असें.

उदीर्ष्वेति जपेन्मंत्रं यदि सा कातरा भवेत्॥

अर्थ- सहगमनास निघालेली स्त्री जर, कातरा म्हणजे भयभीत किती होईल तर तिजला, उदीर्ष्व ना ही मंत्र म्हणुन परत अणावी. हा प्रकार सर्व अत्येष्टीचे ग्रंथात स[illegible]गमन प्रकरणी लिहिला आहे. मंत्र भाष्यकार सायणाचार्य याणी, शौनक प्रोक्त नियोग प्रकार कलियुगांत वर्ज्य असल्यास्तव तदनुसार मंत्र व्याख्यान न करिता शाकल स्मृत्यनुसार व्याख्यान केले त्यात शवासंनिध स्त्रीस निजवणेचा मंत्र.

इयंनारी पतिलोकं वृणाना निपद्यत उप त्वा मर्त्य प्रेतं॥ विश्वं पुराणमनुपालयंती तस्यै प्रजां द्रविणं च धेहि॥

याचा मृत प्रार्थनापर अर्थ लिहिला तो असाकी, हे मृत मनुष्या, तुझी ही स्त्री, अनादिकाल प्रवृत्त, पतीस सोडुन परका भरही राहू नये इत्यादि, पतिव्रता धर्म सर्व क्रमे करून आचरण करीत आलेली विद्यमानी पति लोकाची इच्छा करून तुझे समीप आली आहे, तर इजला या लोकी राहण्याची आज्ञा देऊन, पुत्रादि प्रजा व धन जे

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

आहे ते दुज्या ताब्यांत दे॥ उठउन अंणेचा मंत्र. उदीर्ष्व० याल मृताचे स्त्रीस म्हंणे आहे ते असेंकीं, हे नारी, तू या शवापाशी शयन केले आहेस, तर तेथून उठोन या मनुष्य लोकात ये. तुझे पाणि ग्रहण ज्याणे केले, तो हा तुझा पति, पुनर्विवाह छू म्हणजे उत्तर जन्मी जेव्हा आपला पुनः विवाह करु इछिल, ते वेळेस, तू हे मनुष्यरूप त्याचे जायात्व पाव म्हणजे तूं तं परत चल, सहगमन संकल्पा प्रमाणें, उत्तर जन्मी याचेच स्त्रीत्व मंत्र सामर्थ्यानें सिध्ध आहे ते पाव, तसाच भोग घडोन येईल चिंता करु नकोस. आता पुनर्विवाहोत्तेजक मंडळी भाष्याचा भावार्थ सांगतात त्यास पहा किती विसंगत पण आहे. आधि एक, हस्त ग्रा"भस्य, दिधिषोः॥ ही दोन पदे अनुक्रमानें असता, त्याचा व्युक्रम केला आहे. दुसरे असें. जसे अमुक गृहस्थ पुनः घर बांधतो, असें बोलले असता आपले घर पुनः बांधतो, असा सहज अर्थ बोध होतो. तसा पुनर्विवाहे छु म्हंटले असता आपला पुनर्विवाह करू इछिणारा, हा साहजिक सरळ अर्थ सोडून, विधवा स्त्रीचा पुनर्विवाह करून, ती आपली स्त्री करून घेऊ इछिणारा, असा द्रविड प्राणायामी भाष्याचा भावार्थ काढिला आहे. तिसरे असेंकी शयन मंत्रात ही तुझी स्त्री पतिव्रतेचे सर्व धर्म क्रमानें आचरण करणारी तुझे जवळ आली आहे. तर दुजला येथे राहण्याची आज्ञा देवून, पुत्रादि प्रजा व जिनगी आहे ती इचे ताब्यात दे, असें असून उत्तर मंत्रात, अगे तू पति पासून उठोन इकडे ये, आणि पुनर्विवाहाची स्त्री करून घेणाऱ्याची बाइल खुशाल हो, हे म्हणे किती विसंगत आहे हे सहज सर्व लोक समजतील. तस्मात् सूत्रानुसारी जो, मंत्र भाष्याचा भावार्थ लिहिला तो व सयुक्त आहे.

आतां कितीएक पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचें म्हणणें आहे, जरी पराशर वचनानें पुनर्विवाह न सिद्ध जाहला तथापि प्रकारांतरानें

पुनर्विवाह चालू करण्यास बाध नाहीं. तो असा कीं, कृत, त्रेता, द्वापार, कलि, या च्यार युगांस तीन तीन भाग असतात. प्रथम संध्याभाग, मध्यें मुख्य युग, शेवटीं संध्यांश, यांचें कोष्टक मनुष्य मानाचें वर्षानें आहे.

युगें	१ संध्याभाग	२ मुख्ययुग	३ संध्यांश	०
कृतयुग	१४४०००	१४४००००	१४४०००	१७२८०००
त्रेतायुग	१०८०००	१०८००००	१०८०००	१२९६०००
द्वापारयुग	७२०००	७२००००	७२०००	८६४०००
कलियुग	३६०००	३६००००	३६०००	४३२०००

संध्यांशयोरंतरेणयः कालः शतसंख्ययोः॥
तदेवाहुर्युगंतज्ञायत्र धर्मोविधीयते ॥१॥

अर्थ:- आद्यंत संध्या भागाचे मध्यें जो भाग त्यास मुख्य युग म्हणावे, त्यामध्यें त्यात्या युगाचे धर्म चालू होतात ॥ ॥ या भागवत तृतीय स्कंध प्रामाण्यावरून त्या त्या युगाचे धर्म॥ मुख्य युगांत चालावया चे असा नेम आहे। तेव्हां सांप्रत कलियुगाची सुमारें पांच सहस्त्र वर्षे गुदरली। अद्यापि एकतीस सहस्त्र वर्षे संध्या भाग आहे तो मुख्ययुग नसल्या कारणानें त्यामध्यें कलि धर्माची प्रवृत्तीच नाही॥ तेव्हां। युगांतरचे परवानगीचा विवाहित स्त्रीचा पुनर्विवाह चालू करण्यास बाध नाहीं.

याचें उत्तर युगधर्म॥ मुख्य युगांत चालावयाचे हा नियम कलियुगास लागू नाहीं, यास प्रमाण हरिवंश॥ असें कीं। जनमेजयराजा याणें सर्पसत्र आरंभिलें परंतु ते सिद्धीस गेलें नाहीं।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

तेव्हां आतां अश्वमेध तरी करावा म्हणून त्याचा उपक्रम केला ते समयीं श्रीवेदव्यास येऊन बोलले कीं, सांप्रत दुरत्यय घोर कलियुग प्राप्त जाहलें आहे तूं अश्वमेध करूं नकोस, केल्यास इंद्र विघ्न करील आणि शेवटास जाणार नाहीं. तेव्हां जनमेजय राजा बोलला महाराज, मी अश्वमेध न केल्यानें इतर क्षत्रिय ही कोणी करणार नाहींत, तेव्हां अश्वमेध प्रवृत्ति बुडविण्यास मी कारण जाहलों असा माझा दुर्लौकिक होईल॥ श्रीवेदव्यास बोलले, याची चिंता करूं नकोस. कारण लवकरच धर्मतत्वज्ञ ऋषि अश्वमेधादिक कितीएक कर्में कलीमध्यें करूं नयेत. याविषयीं ठराव करणार आहेत, तेव्हां अश्वमेधादिकर्में सहजच बंद होणार.

युगांतद्वारमृषिभिः संवृतं प्रवरिष्यति॥ तदा
प्रभृति ह्यास्यंतिनृणां प्राप्ताः पुराकृतीः ॥१॥

अर्थ- युगांत म्हणजे कलियुग। त्याचे आरंभरूप द्वार संकुचित होणार आहे, म्हणजे संध्या भागांतच कितीएक धर्मांची बंदी करण्याचा ठराव ऋषि करणार आहेत। तेव्हा त्यापासून मनुष्यास प्राप्त जाहल्या ज्या युगांतरच्या अश्वमेधादि क्रिया त्या कोणी करणार नाहींत ॥ तेव्हां तुजकडे हा अपवाद येईल असें नाहीं, हें श्रवण करून जनमेजय राजानें अश्वमेध रहित केला, परंतु कांहीं दिवसानीं त्यास तें चांगलें वाटेना व ऋत्विजांच्याही भिडा पडल्या यामुळें व्यास वचनाचा अनादर करून पुनः अश्वमेधास आरंभ केला, त्यांत इंद्रानें विघ्न केलें या कारणानें तो सिद्धीस गेला नाहीं. नंतर तेथें मिळाले जे अतींद्रिय ज्ञानसंपन्न धर्मतत्ववेत्ते ऋषि त्यांणीं ज्या धर्मांत कलीचे योगानें यथोक्त फल देण्यानें सामर्थ्य राहिलें नाहीं ते धर्म बंद करण्याचा ठराव केला, त्यास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

धर्मज्ञ समय असें म्हणतात तो आदित्य पुराणांत लिहिला आहे, त्यांतील आरंभाचें वचन.

विहितान्यपिकर्माणिधर्मलोपभयाद्बुधैः॥समा
पनेनिवृत्तानिसाध्वभावात्कलौयुगे ॥ १ ॥

समापनें म्हणजे जनमेजयाचे यज्ञ समाप्तिकालीं असा अर्थ नंद पंडित याणी केला आहे॥ यज्ञाचे अखेरीस ऋषींनीं युगांतरीं किती एक कर्में चालूं होती तीं कलियुगाचे योगानें फल देण्यास असमर्थ जाहलीं यास्तव रद्द केलीं. त्यांतील शेवटचें वचन.

एतानिलोकगुप्त्यर्थं कलेरादौ महात्मभिः॥
निवर्तितानिकर्माणिव्यवस्थापूर्वकंबुधैः॥१॥

अर्थ- विधवेशीं कलियुगामध्यें नियोग करूं नये विधवेचा पुनर्विवाह करूं नये. भिन्नवर्णाच्या स्त्रिया करूं नयेत. इत्यादि ज्या कर्मांत कलीचे योगानें यथोक्त फल देण्याचें सामर्थ्य राहिलें नसून केल्यास उलटा दोष लागणार तीं कर्में कलियुगाचे आदौ म्हणजे प्रारंभीं म्हणजे संध्या भागांतच रद्द केलीं॥ तेव्हां सांप्रत कलीचा संध्याभाग आहे. त्यांत पुनर्विवाह करण्यास बाध नाहीं हें म्हणणें जर आहे तर मग एक पुनर्विवाहच कां प्रवृत्त करितां नियोग, भिन्न वर्णाच्या मुलीशीं विवाह, मांस भक्षण, मद्यपान इत्यादि सर्व धर्मही चालू करण्यास अडचण कोणती, तस्मात् तें म्हणणें फारच असमंजसपणाचें आहे, हे सर्व समजतील.

एवंच विवाहितस्त्रीचे पुनर्विवा[illegible]स। श्रुती।
व। स्मृति।व। पुराण।व सदा[illegible]ींच

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

साधक नाहीं ॥ ॥ असें असून जे कोणी अंगधयाइनें विधवा स्त्री करून घेतील। ते सुतक्या प्रमाणें अपवित्र। व। ती स्त्री शुद्रिणी समान। व। संतती आहल्यास कुंड गोलक। यात्रिवर्गाचें अंन जेउ नये या त्रिवर्गास पंक्तिस घेउ नये। हे वर्णाश्रमबहिष्कृत समजावे ॥ ॥

याएकंदरीतील सिध्धांत असा कीं.

कलियुगांत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य जातीचे स्त्रियांनीं सप्तपदींत विवाह जाहल्या नंतर नष्ट मृतादि कोणतीही आपत्ति येवो. पुनर्विवाह करूं नये ॥ ॥ नष्टाद्यापत्तीस ब्रम्हचर्यानें रहावें ॥ मरणापत्तीस सहगमन करावें, अगर ब्रम्हचर्यानें रहावें ॥ ॥ सप्तपदीचे पूर्वी अंध बधिरादि अल्पापत्ति आल्यास पुनर्विवाह करूं नये ॥ मरणादि महापत्ति मात्र आल्यास प्रायश्चित्त पूर्वक पुनर्विवाह केलाच पाहिजे ॥ ती स्त्री धर्माचे व प्रजेचे उपयोगीं प्रथम विवाहाचे स्त्री प्रमाणें येईल ॥ परंतु तिजला पुत्र होईल तो दुर्ब्राम्हण गणला जाईल। त्यास आणि इतर ब्राम्हणांस फेर इतकाच कीं। तो ज्या वेळेस सोमयाग करील ते वेळेस त्याचे त्रिपुरुषांत वेदाध्ययन व अग्निहोत्र असलें तरी दुर्ब्राम्हण्य जाण्या करितां आश्विन पशु केला पाहिजे ॥ ॥ शूद्र, संकीर्ण जातीचे स्त्रियांनीं सप्तपदीचे उत्तरही पुनर्विवाह इच्छा असेल तर करण्यास फारसा बाध नाहीं.

हा विधवा [illegible]ह निषेध शास्त्रार्थातील संक्षिप्त [illegible] केहिला आहे। विस्तार पाह

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

णे असल्यास। वेधशास्त्र॰ विठोबा अण्णा दप्तरदार कऱ्हाडकर याणी विवाहतत्त्व याना वे ग्रंथाचामसूदा केला आहे व त्यांचे चिरंजीव सीताराम पंत व रघुवीरराव याणी ग्रंथ केले आहेत। ते फुरसदी प्रमाणें दुरुस्त होत आहेत। तेही लवकरच छापण्यांत येतील त्यात पहावा.

असाहा शास्त्रार्थ भाग दुसरा समाप्त जाहला.

भाग तिसरा परिश्रमा विषयीं.

पूर्वी श्रीमद्राजाधिराज रामचंद्र प्रभूचा अवतार धर्मसंस्थापनार्थ जाहला त्यासमयीं त्यांचे रावणादि राक्षस विनाश करण्याचे कामीं सुग्रीव, अंगद, नळ, नीळ, जांबवंत, बिभीषण इत्यादिकानीं परिश्रम केले, परंतु त्यांत प्रथमता वानर संघ मिळवणें व सीता शुद्धि करणें व अशोकवन मोडणें व अक्ष प्रमुख राक्षस मारणें व लंका जाळणें व राक्षसावर जरब ठेवणें व जाहलें वर्तमान श्रीराम प्रभूस निवेदन करणें व श्रीरामाची स्वारि लंकेवर काढणें व सेतु बांधणें व युद्ध प्रसंगात् वारंवार साह्य करणें व द्रोणाचल आणणें इत्यादिक जसा मारुतिरायाचा परिश्रम मुळापासून शेव[illegible]र्यंत रामायणांत आढळतो, तसा धर्मसंस्थापक श्रीजग[illegible] शंकराचार्य स्वामी यांचे पुनर्विवाह खंडनाचे कामीं [illegible]के पंडित मंडळी·

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नीं परिश्रम केले, परंतु त्यांत विठोबा अंणा दप्तरदार कऱ्हाडकर यां-
चे परिश्रम मूळापासून शेवटपर्यंत अनुस्यूत दिसून येतात ते अ-
सेकीं, प्रथमतः प्राचीन ग्रंथ मिळवणें व त्यांतून निषेधक वाक्य
शोधून काढणें व त्या आधारानें ग्रंथरचना करणें व श्री जगद्गुरू-
स वर्तमान श्रुत करणें व विनंति पत्रें लिहून त्यांची स्वारी पुण्यास
आणणें व विष्णुपंडिता बरोबर वादास सिद्ध होणें व आपण के-
लेले ग्रंथाचीं व्याख्यानें सातारा, वांई, पुणें व मुंबई इत्यादि जा-
गोजाग सांगून लोकांचे मनांत पुनर्विवाह सशास्त्र आहे, परंतु
रूढी मात्र नाहीं, असा जो भ्रम शिरला होता तो निखालस का-
ढून टाकून पुनर्विवाह अशास्त्र आहे असें ठरविणें व पुण्यांत
जगद्गुरूंनीं वाद करविला त्यांत स्मृति व पुराणादिक वचनांचा पु-
रावा देऊन पूर्ण साह्य करणें इत्यादि परिश्रम दिसून येतात, व।
अण्णानी पुणें व मुंबई तील लोकांनीं सत्कारार्थ रोख रुपये व
वस्त्रें वगैरे दिली त्या पैकीं बरोबरचे मंडळी सुद्धा वाटखर्च व पो-
टखर्च वजा जाऊन शेष राहिले त्या द्रव्यांत पुणें येथें मिळालेले
व तेथिल विद्वान यांची सभा करून त्यांस दक्षिणा वगैरे देऊन,
योग्यतेनुसार वस्त्रें घरीं पाठऊन दिली शेवटीं, कऱ्हाड क्षेत्रीं
सिद्धेश्वर, दीक्षित गरुड याणी ज्योतिष्टोम केला, त्यांत ऋत्वि-
जास धोत्रजोडे व दीक्षितास शालजोडी दिलि, असा मिळा-
ले द्रव्याचा विनियोग केला. यास्तव त्या धर्मैक निष्ठ पुरुषावर
परमेश्वराचा प्रसाद असो अशी सर्वांनीं परमेश्वरापाशी प्रा-
र्थना करावी ही आमची विनंति आहे.

हे अंणाचे परिश्रम जाणून श्री जगद्गुरूंनीं सत्कार पूर्वक
मान दिल्हा तें मान्‍य [illegible] ठिकाणीं लिहिलें आहे त्यावरून कळेल.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=10.08.20 17:12
,TRANSFERRED=2020/08/10 at 17:25:44
,PAGES=73
,TYPE=STD
,NAME=S0003463
,Book Name=M-2740-VIDHAWA VIVAH SAMANCHA ITIHAH
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection